cmyk

## संपादकीय

### ‘गळती’ सकरकारचे वाभाडे निघतेय!

दिल्लीत जोरदार पावसाने अनेक ठिकाणी पाणी साठले. जनजीवन विस्कळीत झाले. जोरदार पावसाचा फटका नव्या संसद भवनालाही बसला. नव्या संसद भवनाच्या खासदार लॉबीमध्ये पाणी गळती झाली. काँग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी ‘एक्स’वर चित्रफीत टाकल्यामुळे या गळतीला वाचा फुटली. सुमारे १२०० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या नव्या इमारतीच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, खासदार टागोर यांनी सभागृहात चर्चेची मागणी केली.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### जीएसटी मुद्द्यावरून संसद परिसरात इंडिया आघाडीची जोरदार निदर्शने

नवी दिल्लीः संसद परिसरात विरोधी पक्ष नेत्यांच्या इंडिया आघाडीने मंगळंवारी (दि, ६ ऑगस्ट) आरोग्य विमा आणि जीवन विम्यावरील जीएसटी मागे घेण्याच्या मागणीसाठी सरकारविरोधात संसदेच्या मकरद्वार बाहेर निदर्शने केली. यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींसह प्रमुख विरोधी पक्षातील नेते देखील उपस्थित होते. मोदी सरकारने आपल्या रिकव्हरी बजेटमध्ये आरोग्य आणि जीवन विमा सेवांवरील जीएसटी वाढवला आहे. त्यामुळे या सुविधांसाठी जनतेला इथून पुढे अधिक खर्च करावा लागणार आहे. मोदी सरकारच्या या वसुलीविरोधात भारत आघाडीच्या नेत्यांनी संसदेच्या संकुलात निदर्शने केली.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०७ | बुधवार दि.०७ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# हरियाणाच्या धर्तीवर महाराष्ट्रात हमीभाव द्या!

## शेतकऱ्यांच्या मागणीला जोर




नवी दिल्ली । वृतसंस्था

हरियाणा सरकारने राज्यातील २४ पिके हमीभाव किंमतीवर खरेदी करण्याचा निर्णय कॅबिनेट मंत्रिमंडाच्या बैठकीत घेतला. मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांनी कुरुक्षेत्र येथील जाहीर सभेदरम्यान याबाबत घोषणा केली होती. त्यानंतर यावर शिक्कामोर्तब झाले आहे. यावरून आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी राज्यातील सर्व पिकांची खरेदी हमीभाव किंमतीवर केली जावी अशी मागणी केली आहे.

मुख्यमंत्री सैनी यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे प्रत्येक पीक किमान आधारभूत किमतीवर (हमीभाव) खरेदी करण्याची घोषणा केली. इतकेच नाही तर कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेऊन नव्याने १० पिकांचा समावेश केला. यामुळे हरियाणातील शेतकऱ्यांच्या २४ पिकांची हमीभावाच्या किंमतीनुसार खरेदी होणार आहे. तर सरकार नाचणी, सोयाबीन, काळे तीळ, नायजर बियाणे, करडई, बार्ली, मका, ज्वारी, ताग, कोपरा आणि मूग या दहा पिकांची देखील हमीभावाच्या किंमतीनुसार खरेदी करणार आहे. याच्याआधी १४ पिकांची खरेदी सरकार हमीभावाच्या किंमतीनुसार करत होते. हरियाणा सरकारने आगामी निवडणूका आणि हरियाणात सुरू असणाऱ्या शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर हमीभावावर पिकांच्या खरेदीचा निर्णय घेतला आहे. यावर आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी हरियाणाच्या धर्तीवर राज्यातील ◀◀ पान २ वर

### खरीप हंगामातील १४ पिकांच्या हमीभावात वाढ

खरीप हंगामात केंद्र सरकारने १४ पिकांच्या हमीभावात वाढ करण्याचा दावा केला होता. या केंद्र सरकारच्या या दाव्याप्रमाणे केंद्र सरकारने धान, कपाशीसह ज्वारी, नाचणी, बाजरी, मक्का, मूग, तूर, उडीद, तीळ, भुईमूग, रेपीसीड, सूर्यफूल, सोयाबीन पिकाच्या हमीभावात वाढ केली. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या बैठकीत (१९ जून) निर्णय घेण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला होता.

### हमीभावासाठी सातत्याने आंदोलन...

महाराष्ट्रात हमीभावाची मागणी १९८० पासून विविध शेतकरी संघटना करत आहेत. काही पिकांना एमएसपी मिळाला तो ही मात्र अपुरा. तर सोयाबीनला हमीभाव मिळावा म्हणून नागपुरमध्ये २०१७ साली शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. यानंतर जून २०१८ मध्ये हमीभावाच्या मुद्द्यावरून राज्यातील शेतकरी संपावर गेले होते. त्यानंतर २०२० आणि आता २०२४ मध्ये देखील हरियाणाच्या सीमेवर शेतकरी हमीभाव कायद्यासह आंदोलन करत आहेत. यात राज्यातील शेतकरी संघटना सामिल आहेत. जुलै २०२४ मध्ये अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वात कांदा आणि दुधाला हमीभावाप्रमाणे किंमत मिळावी यासाठी आंदोलन करण्यात आले.

# फडणवीसांनी शब्द पाळला; श्री क्षेत्र अरण तिर्थक्षेत्राला अ वर्ग दर्जा देत १०० कोटीचा निधी

## मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांना यश–अॅड.सुभाष राऊत

बीड । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र अरुण येथे नुकताच श्री संत शिरोमणी सावता महाराज भक्तनिवास वास्तुशिल्पाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. मंत्री छगन भुजबळ यांनी पाठपुरावा केल्यावर यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० कोटी रुपये निधी देण्याबरोबरच अ वर्ग दर्जा देण्याचा शब्द दिला होता. फडणवीसांनी शब्द पाळला असून श्रीक्षेत्र अरण या तीर्थक्षेत्रास अ दर्जा आणि १०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. मंत्री भुजबळ यांच्या पाठपुराव्याला यश आले असून समता परिषदेच्या वतीने फडणवीस यांचे आभार मानले असल्याचे अॅड. सुभाष राऊत यांनी सांगितले. तसेच बीड जिल्ह्यामध्ये जल्लोष साजरा करण्यात आला आहे.







रविवार, दि. ४ ऑगस्ट रोजी श्रीक्षेत्र अरण येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज भक्तनिवास वास्तुशिल्पाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते संत शिरोमणी सावता महाराज भक्तनिवास वास्तुशिल्प कामाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये फडवणीस यांनी श्रीक्षेत्र अरणला तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबरोबरच शंभर कोटीचा निधी देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर फडणवीस यांनी शब्द पाळला असून शंभर कोटीच्या निधीसह अ वर्ग दर्जा दिला आहे. याबद्दल देवेंद्र फडणवीस आणि छगनराव भुजबळ यांचे आभार समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड ◀◀ पान २ वर

# बीडकरांच्या प्रश्नावर शिवसंग्राम आक्रमक; नगर पालिकेवर धडक

## डॉ. ज्योतीताई मेटे यांची उपस्थिती; मुख्याधिकारी गैरहजर असल्याने दालनातच मांडला ठिय्या

बीड । प्रतिनिधी

शहरात गेल्या तीन वर्षापासून विविध प्रश्नांनी नागरीक त्रस्त झाले आहेत. प्रशासक असल्याने शहरातील समस्या सुटण्यापेक्षा त्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे बीडकरांसाठी मंगळवारी दुपारी शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी थेट नगरपालिकेवर धडक देत मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच ठिय्या आंदोलन केले. शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे या नगरपालिकेत येताच मुख्याधिकारी तेथे पोहचल्या.

गेल्या तीन वर्षापासून बीड नगरपालिकेवर प्रशासक आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे या



असून शहराला पाणी पुरवठा २० ते २५ दिवसाने होतो. सर्वत्र घाणीचे साम्राज्य असून रस्त्यावर खड्डेच खड्डे आहेत. रस्त्यावरील अनेक ठिकाणचे पथदिवे बंद असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे. यासह विविध प्रश्नावर ◀◀ पान २ वर

### महिलांचा सहभाग लक्षणीय

शिवसंग्रामच्या वतीने बीड शहरातील विविध प्रश्नावर मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यासाठी महिला कार्यकर्त्यांसह शहरातील महिलांचा सहभाग लक्षणीय होता. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकीवरुन पडून जखमी झालेल्या महिला सुध्दा मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात आल्या होत्या.

## सचिन शिंदे यांचे निधन

दिंद्रुड–येथील हॉटेल व्यवसायिक सचिन उर्फ मामा शिंदे यांचे अल्पशा आजाराने सोमवारी सायंकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ४३ होते.



सचिन मामा शिंदे हे दिंद्रुड परिसरात हॉटेल व्यवसायिक म्हणून सर्वपरिचित होते. कमी वयामध्ये त्यांनी या क्षेत्रामध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर ◀◀ पान २ वर

# आरक्षणप्रश्नी गर्जना करणाऱ्या फडणवीसांनी १० वर्षे काय केले?

## पटोले यांचा सवाल,महाराष्ट्रातील आरक्षणाचा पेच पंतप्रधानांनी पुढाकार घेऊन सोडवावा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील आरक्षणाच्या प्रश्नाचा पेच हा भारतीय जनता पक्षाने निर्माण केला आहे. २०१४ साली देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा, धनगर, आदिवासी समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतरही फडणवीस यांनी राणाभीमदेवी थाटात गर्जना करत, सत्तेत आलो तर २४ तासात आरक्षणांचा प्रश्न सोडवतो अशी वल्गना केली होती पण १० वर्ष केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असूनही आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच आता पुढाकार घेऊन आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी ◀◀ पान २ वर



# गावगाड्यांच्या मागण्या रास्त ;मुख्यमंत्र्यांसमवेत सरपंच परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊ–शरद पवार

## सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांना दिला शरद पवार यांनी शब्द

पुणे । प्रतिनिधी

सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रने सरकारला गावगाड्यांच्या अनेक मागण्यांचे निवेदने दिले मात्र सरकार ग्रामीण भागातील प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे.त्यामुळे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील सरपंचानी



जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देत आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातुन आंदोलनाची सुरुवात करत सरपंच परिषदेच्या राज्य कार्यकारिणीने ◀◀ पान २ वर

## आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी पुन्हा पुढे ढकलली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी एकत्र होईल असा निर्णय सुप्रीम कोटीने दिला होता. या निर्णयानुसार मंगळवारी दि.६ रोजी सुप्रीम कोर्टात दोन्ही प्रकरणाची सुनावणी पार पडली. आता सुप्रीम कोर्टाकडून आमदार अपात्रतेची सुनावणी तीन आठवडे पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे आता सप्टेंबर महिन्यात या प्रकरणावर नव्याने सुनावणी होणार आहे. ◀◀ पान २ वर



## बीडमध्ये बुंदेलपुरा मस्जिदमध्ये राडा, हल्यामध्ये दोन गंभीर

बीड । प्रतिनिधी

शहरातील बुंदेलपुरा भागात असलेल्या मस्जिद मध्ये नमाज साठी जाणाऱ्या तिघांवर आठ ते दहा जणांनी काठ्या, कुऱ्हाडी, तलवार आणि चाकूने हल्ला केला. यामध्ये दोघांची प्रकृती गंभीर आहे. पवित्र मस्जिद मध्ये घुसून हल्ला करण्याच्या प्रकाराचा मुस्लिम समाजाने निषेध केला आहे. आरोपीना तातडीने अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०६ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.५० क्विंटल | २,६५० | २,९९० | २,८२० |
| ज्वारी/हायब्रिड :३९.५० क्विंटल | २,००० | ३,३०० | २,३४७ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,००० | ३,४०० | २,७९६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,७०१ | ७,३५० | ६,५८३ |

# बांग्लादेशात हिंदू धोक्यात, इस्कॉन मंदिर पेटवले, मुर्तीची तोडफोड

ढाका । वृत्तसंस्था

शेख हसीना यांनी देश सोडताच बांगलादेशमध्ये उत्पात सुरु झाला आहे. बांगलादेश हा मुस्लीम बहुल देश आहे. त्यामुळे याठिकाणी राहणाऱ्या अल्पसंख्यांक हिंदूंच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. आंदोलकांमधील कट्टर लोकांकडून हिंदू मंदिर लक्ष्य केले जात आहे.

बांगलादेशच्या खुलना भागातील मेहरपूरमधील इस्कॉन मंदिराला लक्ष्य करण्यात आले आहे. याठिकाणी मूर्तीची तोडफोड करण्यात आली. तसेच, मंदिराला आग लावण्यात आली. दोघांचा यात मृत्यू झाल्याची माहिती आहे. इस्कॉन मंदिराचे प्रवक्ते युधिष्ठिर गोविंद यांनी या घटनेची पुष्टी केली आहे.



मेहरपूरमधील हिंदू मंदिरात आग लावण्यात आली, त्यानंतर भगवान जगन्नाथ, बलदेव, सुभद्रा यांच्या मूर्ती फोडण्यात आल्या. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे कार्यकर्ते धुमाकूळ घालत आहेत. त्यामुळे देशात हिंदू धोक्यात आले आहेत. इस्कॉनचे कृष्णादास यांनी सांगितले की, २९ जिल्ह्यांमधील हिंदू मंदिरांना आणि हिंदूंना लक्ष्य करण्यात आले आहे. ढाकामधील इस्कॉन मंदिरावर देखील हल्ला करण्यात ◀◀ पान २ वर

### विद्यार्थ्यांच्या परतीसाठी उपाययोजना–मुख्यमंत्री शिंदे

बांग्लादेशातील नागरी अशांततेच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मायदेशात त्यांच्या परतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाची पाऊले उचलली आहेत. या विद्यार्थ्यांना तातडीची मदत उपलब्ध होणे आणि त्यांची भारतात परतण्यासंदर्भातील आवश्यक कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला. बांग्लादेशातील अशांततेमुळे परदेशी नागरिकांच्या, विशेषतः अशांत भागात अडकलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांनी तिथे शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्राधान्य दिले आहे.

### संसद विसर्जित,माजी पंतप्रधान खालिदा झियांची सुटका

बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी संसद बरखास्त केली आहे. देशाच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचीही सुटका करण्यात आली आहे. आंदोलक विद्यार्थ्यांनी मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत संसद बरखास्त करण्याचा अल्टिमेटम दिला होता. बांगलादेशात पंतप्रधान शेख हसीना यांच्या विरोधात दोन महिने चाललेल्या आंदोलनादरम्यान सोमवारी मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. यानंतर त्यांनी पदाचा राजीनामा दिला आणि भारत गाठला. अजित डोवाल यांनी त्यांच्याशी हिंडन एअरबेसवर सुमारे तासभर चर्चा केली. मंगळवारी भारतातील सर्वपक्षीय बैठकीत परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर म्हणाले, ‘‘शेख हसीना यांना धक्का बसला आहे. सरकार त्यांना बोलण्याआधी थोडा वेळ देत आहे. त्या स्वतःच्या भविष्याचा निर्णय घेतील.‘‘ त्या लंडन किंवा फिनलंडला जाण्याची शक्यता आहे.

cmyk

## अग्रलेख

# ‘गळती’ सकरकारचे वाभाडे निघतेय!

दिल्लीत जोरदार पावसाने अनेक ठिकाणी पाणी साठले. जनजीवन विस्कळीत झाले. जोरदार पावसाचा फटका नव्या संसद भवनालाही बसला. नव्या संसद भवनाच्या खासदार लॉबीमध्ये पाणी गळती झाली. कॉंग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी ‘एक्स’वर चित्रफीत टाकल्यामुळे या गळतीला वाचा फुटली. सुमारे १२०० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या नव्या इमारतीच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, खासदार टागोर यांनी सभागृहात चर्चेची मागणी केली. टागोर यांनी संसद भवनातील गळतीबाबत स्थगन प्रस्ताव दिला. संसदेबाहेर पेपरफुटी आणि संसदेच्या आत पाण्याची गळती अशी टीका त्यांनी केली. पाण्याची गळती झालेल्या लॉबीचा विद्यमान राष्ट्रपतींनी वापर केला होता. इमारत बांधून फक्त एक वर्ष झाले असताना पाण्याची गळती कशी होऊ शकते असा सवाल टागोर यांनी केला असून इमारतीच्या टिकाऊपणाचा मुद्दा गंभीर असून त्यावर तातडीने तोडगा काढला पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. नव्या इमारतीची सखोल पाहणी करण्याची गरज असून त्यासाठी सर्वपक्षीय समिती नेमण्याची मागणीही त्यांनी केली.

पंतप्रधान मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांनी नव्या संसदेच्या बांधणीचा प्रकल्प हाती घेतला होता. काही महिन्यांपूर्वी भारतीय संसदेचे काम नव्या इमारतीमध्ये सुरू झाले. मोठ्या थाटामाटात नव्या संसदेचे उद्घाटन झाले होते. मोदींनी ‘शेंगोल’ स्थापन करून नव्या इमारतीचे उद्घाटन केले होते. उद्घाटन प्रसंगी साधू-संतांसह अनेकजण उपस्थित होते. जुन्या इमारतीमध्ये जागा कमी पडत होती म्हणून नव्या इमारतीची निर्मिती करण्यात आली, असे सरकारकडून सांगण्यात आले.

नवी दिल्लीत नव्या संसद भवनाला पहिल्याच पावसात गळती लागली. जेमतेम १४ महिन्यांपूर्वी मोठा गाजावाजा करून उभ्या करण्यात आलेल्या नव्या संसद भवनाला गळती लागली. ३१ जुलै रोजी झालेल्या पावसामुळे खासदारांच्या एका लॉबीत छतातून पाणी टपकू लागल्याने तेथे बादली ठेवण्याची वेळ आली. नव्या संसदभवनाचे उद्घाटन २८ मे २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. नव्या संसद इमारतीमध्ये अनेक सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, विरोधकांनी या नव्या संसद इमारतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. नव्या इमारतीत अनेक त्रुटी राहिल्याचे त्यांचे म्हणणे आहे. नव्या संसदेत गळती सुरू झाल्याने विरोधकांना टीकेची आयती संधी मिळाली. या मुद्यावरून विरोधक एनडीए सरकारला धारेवर धरत आहेत. संसदेची नवी इमारत पर्यावरणस्नेही असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र निसर्गाचे तिच्यावर इतके प्रेम असेल असे वाटले नव्हते, असा टोला कॉंग्रेस खासदार रणदीप सुरजेवाला यांनी लगावला. १२०० कोटींच्या इमारतीला १२० रुपयांच्या बादलीचा आधार अशी टिप्पणी आम आदमी पक्षाने केली. समाजवादी पक्षाचे प्रमुख व लोकसभेतील खासदार अखिलेश यादव यांनी नव्या इमारतीच्या बांधकामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा अप्रत्यक्ष आरोप केला आहे. या संसदेपेक्षा जुनी इमारत चांगली होती. तिथे जुने सहकारी येऊन भेटत तरी होते. पुन्हा एकदा त्या जुन्याच संसद भवनात जाऊ. संसदेच्या छतातून पाणी पडणे बंद होत नाही तोवर तरी जाऊ. भाजप सरकारच्या काळात बांधलेल्या प्रत्येक छतातून पाणी टपकते. हा त्यांनी खूप विचारपूर्वक रचना केल्याचा परिणाम असेल की आणखी काही असा सवाल अखिलेश यांनी केला.

भारतातील कष्टकरी करदात्यांचे १२०० कोटी रुपये खर्च करून निकृष्ट दर्जाचे नवे संसदभवन उभारले परंतु मुसळधार पावसामुळे अवघ्या १४ महिन्यांत नव्या संसद भवनात गळती सुरू झाली. ही आहे मोदी सरकारची निकृष्ट कामांची गॅरंटी, असे म्हणत राष्ट्रवादी शरद पवार गटाने मोदींवर निशाणा साधला. काही महिन्यांपूर्वी अयोध्येतील राम मंदिराला गळती लागल्याचा प्रकार समोर आला होता. त्यावरून विरोधकांनी जोरदार टीका केली होती. राम मंदिर बांधून एक वर्ष झाले पण एकाच पावसात राम मंदिरात गळती लागली. आता नव्या संसद भवनालाही गळती लागली आहे. त्यावर बोलताना संजय राऊत म्हणाले, जुनी इमारत सुस्थितीत होती, ती अजून अनेक वर्षे चालली असती. ग्रीक आणि इतर देशांच्या संसद इमारती जुन्याच आहेत. ठेकेदारांना काम दिल्याने हा प्रकार घडला आहे. ठेकेदार आणि सरकारचा हिशेब झाला पाहिजे. कोणाला किती कमिशन मिळाले हे उघड झाले पाहिजे असे राऊत म्हणाले. गत ७० वर्षांत देशात काहीच घडले नाही अशी वारंवार टीका करणाऱ्यांच्या दहा वर्षांच्या कालावधीत बांधलेल्या अतिशय महत्त्वाच्या दोन वास्तूंत पहिल्याच पावसात जलाभिषेक होणार असेल तर त्यांचा दर्जा काय आहे हे स्पष्ट दिसते आहे. गत ७० वर्षांत बांधलेली धरणे, जलविद्युत प्रकल्प, जागतिक दर्जाच्या शिक्षणसंस्था एखादा अपवाद वगळता आजही ताठ मानेने उभ्या आहेत. आज वास्तुशास्त्र अद्ययावत झाले असताना अशा गळक्या इमारती बांधून दाखवणे हा पराक्रमच म्हटला पाहिजे. ‘नल से जल’ योजना ऐकली होती पण ‘छप्पर से जल’ हा भीमपराक्रमच म्हटला पाहिजे.

# जालना-नांदेड समृद्धी शेतकऱ्यांच्या फळबागांना वाढीव दर द्यावा-आ.गोरंट्याल

## कृषिमंत्री धनंजय मुंढेंची भेट घेवून केली मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**नांदेड समृद्धी महामार्गासाठी संपादीत होणाऱ्या जमिनीतील फळबागांना योग्य दर निश्चित करून त्याबाबतचा शासन निर्णय काढण्यात यावा अशी आग्रही मागणी जालन्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंढे यांच्याकडे आज मंगळवारी लेखी पत्राद्वारे केली आहे.**

जालना - नांदेड या समृध्दी महामार्गावरील शेतजमिनी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा आ. कैलास गोरंटयाल यांनी दि. २ ऑगस्ट शुक्रवार रोजी जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे मांडून अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली होती.त्यावेळी जिल्हाधिकारी पांचाळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारकडे त्याबाबत प्रस्ताव पाठवणार असल्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान, आ. कैलास गोरंटयाल यांनी आज मंगळवारी याच



प्रश्नासाठी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंढे यांची मुंबई येथे मंत्रालयात भेट घेतली. जालना - नांदेड समृद्धी महामार्गाची अधिसुचना ही २०२१ साली कोविड महामारीचे निर्बंध असतांना काढण्यात आलेली आहे. कोरोना महामारीमुळे बाजारपेठा बंद होत्या. त्यामुळे जालना - नांदेड समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीतील द्राक्ष, डाळींब, सिताफळ, जांब या फळझाडांचा दर कमी निघाला असून या तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे नुकसान होत आहे. प्रशासन या अडचणींची दखल घेत नसल्याने जमीन संपादनासाठी शेतकरी संमती देखील देत नसल्याचे आ. गोरंटयाल यांनी कृषिमंत्री धनंजय मुंढे यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. यापूर्वीच्या मुंबई - नागपूर या समृद्धी महामार्गासाठी संपादित जमिनीच्या दरापेक्षाही कमी दर फळझाडांना दिला आहे. याबाबत योग्य ते आदेश काढून शेतकऱ्यांना संपादीत होणाऱ्या शेतजमिनीच्या फळझाडांचा चालू वर्षाचा सुधारित दर देण्याबाबतचे आदेश काढून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी केली. कृषिमंत्री धनंजय मुंढे यांनी या प्रकरणी तातडीने दखल घेऊन दर वाढवून देण्याबाबतचे सुधारित शासन आदेश काढण्याची ग्वाही दिली. यावेळी रामनगर येथील गोपाल मोरे,गणेश गिराम यांची उपस्थिती होती

# जालना जिल्ह्यातील महायुती विधानसभेच्या पाच जागा जिंकणार-रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**भाजपा जिल्हा जालना ची (विस्तारित कार्यकारिणी बैठक) महा अधिवेशन हे भाजपा जिल्हाध्यक्ष व जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, राजेश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६ ऑगस्ट रोजी मुक्तेश्वर लॉन्स,कचेरी रोड,जुना जालना संपन्न झाले.**

माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, लोकसभा निवडणूक २०२४ चा पराभव विसरा व येणाऱ्या विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये अंग झटकून कामाला लागा व विरोधकांचे फेक नरेटीव्ह खोडून काडून आपल्या केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी जनतेच्या उपयोगासाठी केलेल्या सोयीसुविधा सवलती जन कल्याणकारी योजना घरोघरी जनतेपर्यंत जाऊन सांगा व पुन्हा एकदा जिल्ह्यातील पाच ही जागा महायुतीच्या पारड्यात येण्यासाठी परिश्रमाची पराकाष्टा करून विजयश्री खेचून आणा, आम्ही ज्यावेळेस भाजपाचे काम करण्यास सुरुवात केली



त्यावेळी कधी असे वाटले नाही की देशभरात राज्यात आमची सत्ता येईल पण लोकांचे कामे करत गेलो पहिल्यांदा सभापती दोन वेळेस आमदार पाच वेळेस खासदार तीन वेळेस केंद्रात मंत्री व भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष याच जनतेच्या आशीर्वादाने झालो त्यामुळे २०२४ लोकसभेला पराभूत झाल्यानंतरही हाताश न होता दुसऱ्या दिवसापासून जनतेच्या दरबारात दाखल झालो कार्यकर्त्यांना धीर दिला व पुन्हा कामाला लागलो महाराष्ट्रभर जिल्हाभर दौरे केले व येणाऱ्या विधानसभेच्या कामासाठी जनतेने पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी व मित्र पक्ष यांना निवडून द्यावे यासाठी पुन्हा प्रयत्न सुरू केले असे प्रतिपदान जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील २००० पेक्षा जास्त जिल्हा व तालुका पदाधिकारी यांच्या समोर अधिवेशनात बोलताना माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

# कृषी उत्पन्न समितीचे सचिव मोहन राठोड यांची संचालकपदी निवड

**जालना । प्रतिनिधी**

**कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव संघाच्या अध्यक्षपदी विलास पुंडकर तर संचालकपदी जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मोहन राठोड यांची नियुक्ती करण्यात आली.**



शेगाव यसेथे कृषी उत्पन्न बाजार समितीयांच्या सचिव या पदाचे विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या धर्तीवर 'सचिव केडर' स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर तसेच पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १५ जुलै व १ ऑगस्ट रोजी राज्यातील बाजार समितीचे सचिवांचे कामकाजाबाबत अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी संबंधाने बाजार समिती यांना निर्गमित केलेले कलम ४० (ई) अन्वये निर्देशांबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. तसेच सर्वानुमते अध्यक्षपदी विलास पुंडकर यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष काटोलचे पराग दाते, संघाचे सचिव पदी फलटणचे शंकरराव सोनवलकर, सहसचिवपदी कर्जत (अहमदनगर) सतीश कदम तसेच खजिनदार पदी बार्शीटाकळी (अकोला) बाजार समितीचे सचिव सतीश शेळके यांची पदाधिकारी म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. सदर कार्यकारणीमध्ये संचालक म्हणून नाशिक विभाग मधून यावल स्वप्निल सोनवणे,अमरावती विभाग मधून अमरावती दीपक विजयकर, नागपूर विभाग मधून आष्टीचे नंदकुमार वरकड, पुणे विभाग मधून बारामतचे अरविंद जगताप, छत्रपती संभाजीनगर विभाग मधून जालनाचे मोहनराव राठोड, पालघर मुंबई विभाग मधून भिवंडीचे यशवंत म्हात्रे, लातूर विभाग मधून हरिभाऊ सवने, कोल्हापूर सातारा विभाग मथून जावलीचे महेश देशमुख व महिला प्रतिनिथी म्हणून राजुरा (चंद्रपूर) बाजार समितीच्या सचिव कु. मंगला मेश्राम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदर सभेत राज्यातील १०० चे वर मान्यताप्राप्त कायम सचिवांची उपस्थिती होती. यावेळी, सचिव संघाचे विकासासाठी, राज्यातील बाजार समिती सचिवांचे समस्यांचे निराकरण करण्यासाठी कर्तव्यदक्षतेने काम करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास पुंडकर यांनी सांगितले.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पुर्णपणे अंमलात आणल्यानंतर शिक्षण क्षेत्रात बदल होणार-प्राचार्य डॉ.अग्निहोत्री

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील जेईएस महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागातर्फे सोमवारी बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी प्रथम वर्षांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी उदबोधन शिबीर आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या पदवी प्रथम वर्गासाठीच्या अभ्यासक्रमात मुख्य विषय, उपविषय, वैकल्पिक विषय, कौशल्य घटक, क्षमता वृद्धी, मूल्य विषय, भारतीय ज्ञान परंपरा, इंटर्नशिप इत्यादी घटकांचा समावेश असल्याने त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना होईल असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी मार्गदर्शन व अध्यक्षीय भाषण करताना केले. डॉ. अग्निहोत्री पुढे बोलताना म्हणाले की, विद्यापीठाने तयार केलेल्या अभ्यासक्रमात प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटकांचा समावेश केला असून प्रात्यक्षिकावर आधारित ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे हा मुख्य उद्देश ठेवला आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यवृद्धी वाढली तर त्याचा उपयोग त्यांना वेगवेगळ्या इंडस्ट्रीज मध्ये नोकरी मिळविण्यासाठी होईल, मूल्यात्मक शिक्षणातून एक संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक



घडविण्यासाठी मूल्य शिक्षणाचाही अभ्यासक्रमात समावेश केला असल्याचे त्यांनी म्हटले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना आयक्युएसी चे समन्वयक व शिबीराचे आयोजक प्रा. डॉ. गणेश रोकडे यांनी उदबोधन शिबीर घेण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. यानंतर महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी महाविद्यालयात असलेल्या सर्व सोयी सुविधांची, सर्व विभागातर्फे व महाविद्यालया तर्फे वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना देऊन या सर्व सोयी सुविधांचा व राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी फायदा घेण्याचे आवाहन केले. यानंतर महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या वेगवेगळ्या विभागांची माहिती देण्यात आली. यामध्ये एनसीसी चे महत्त्व व त्यामधील करिअर ची माहिती कैप्टन फुलचंद मोहिते यांनी दिली. एनएसएस मध्ये का सहभागी व्हावे व एनएसएसचे महत्त्व प्रा. राजेश सरकटे यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. यानंतर महाविद्यालयात स्पोर्टस विभागात असणाऱ्या सोयी सुविधा व करिअर संदर्भात प्रा. डॉ. किशोर बीरकायलू यांनी मार्गदर्शन केले. लोककला विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या ॲक्टीव्हीटीज व कोर्सेस बद्दल प्रा. कल्याण उगले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. स्कील डेव्हलेपमेंट अंतर्गत व महाराष्ट्र शासनामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती बद्दल प्रोफेसर गणेश कुलकर्णी यांनी माहिती दिली. महाविद्यालयात नव्याने सुरूवात करण्यात आलेल्या अकॅडमी ऑफ लिडरशिप चे प्रमुख प्रा. नागनाथ शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना अकॅडमी बद्दल मार्गदर्शन केले. ललित कला विभागा अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती विभागाचे प्रमुख प्रोफेसर यशवंत सोनुने यांनी दिली. महाविद्यालयात नव्याने सुरुवात करण्यात आलेल्या स्माईल गर्ल्स असोसियशन च्या अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती प्रा. दीपा राठी यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये असलेल्या स्कील एनहांसमेंट कोर्सेस व ओपन इलेक्टीव कोर्सेस विद्यार्थ्यांनी कसे निवडायचे व का निवडायचे, त्याचे फायदे काय आहेत याचे सखोल मार्गदर्शन प्रोफेसर सुशांत देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राखी पारवे यांनी तर आभार प्रा. किशोर तापडिया यांनी मानले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकांसह बी.ए., बी. कॉम आणि बी. एस्सी प्रथम वर्गात प्रवेशित असलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १वरून...

### हरियाणाच्या धर्तीवर

सर्व पिकांची खरेदी हमीभाव किंमतीवर केली जावी, अशी मागणी केली आहे. राज्यातील नांदेड, लातूरसह मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी हरियाणा सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच राज्यातील मराठवाड्यात सतत दुष्काळ पडत असल्यानेच येथे सर्वाधिक आत्महत्या होतात अशी प्रतिक्रिया दिली आहे. हरियाणाप्रमाणे राज्यातही भाजपचे सरकार आहे. जर हरियाणा शेतकऱ्यांसाठी निर्णय घेत असेल तर राज्यातील महायुती सरकारला का घेता येत नाही, असा सवाल केला आहे. हरियाणाप्रमाणे राज्यातही निर्णय झाल्यास त्याचा फायदा राज्यातील लाखो शेतकऱ्यांना होईल. त्यामुळे राज्यातील महायुती सरकारने हमीभाव कायदा लागू करावा, अशी विनंती शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच महायुती सरकारने हरियाणाप्रमाणे निर्णय घेतल्यास शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर ठरणार असून शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना चांगला भाव मिळेल. त्यांचा उत्पन्नात वाढ होईल, असा आशावादही राज्यातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. बाजारात आवक वाढल्यास बाजारभाव पडतो. यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी हमीभाव कायदा गरजेचा असल्याचे राज्यातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. राज्यातील महायुती सरकार असो किंवा इतर कोणतेही ते शेतकरी वर्ग वगळता इतर सर्व वर्गांसाठी योजना राबवते. मात्र शेतकरी हिताचा निर्णय घेत नाहीत. आताही हाच कित्ता गिरवला जात आहे. यादरम्यान हरियाणा सरकारने काहीही असो पण शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा हमीभाव कायद्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी आता लवकरात लवकर निर्णय घ्यावा. राज्यातील पिकांची खरेदी हमीभाव किंमतीनुसार करावी. अन्यथा आगामी काळात सरकारला शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असेही शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

-------------

### बीडकरांच्या प्रश्नावर शिवसंग्राम

शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी नगरपालिका कार्यालय गाठले. यावेळी निवेदन देण्यात येणार असल्याने कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी यांच्या दालनात जाऊन पाहिले तर त्या तेथे नव्हत्या. त्यामुळे संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी तेथेच ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर डॉ. ज्योतीताई मेटे नगरपालिकेत पोहचल्यावर मुख्याधिकारीही आल्या. यावेळी डॉ. मेटे आणि मुख्याधिकारी अंधारे यांच्यात बीड शहरातील प्रश्नावर बराच वेळ चर्चा झाली. एक महिन्यात शहरातील प्रश्न सोडवण्याचे आश्वासन अंधारे यांनी दिले असून याकडे दुर्लक्ष केल्यावर तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा डॉ. ज्योतीताई मेटे, शहराध्यक्ष सुहास पाटील, दत्ता गायकवाड यांनी दिला आहे. यावेळी शिवसंग्राम ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुका अध्यक्ष नवनाथ प्राभाळे यांच्यासह शिवसंग्राम पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरतील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### फडणवीसांनी शब्द पाळला; श्री क्षेत्र अरण

जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, बीड जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, नितीन राऊत, मंगेश जमदाडे, महेश चौधरी, संतोष यादव, वैभव खेत्रे, अविनाश शिंदे, महेश दुधाळ आदिंनी मानले आहेत.

---------------

### गावगाड्यांच्या मागण्या रास्त

राज्यातील सर्व पक्षप्रमुखांच्या भेटी घेण्याचा निर्णय घेत त्यांच्याकडे परिषदेच्या मागण्या मांडून त्या बाबत सरकारकडे आपण आग्रह धरावा अशी मागणी केली.त्याचाच भाग म्हणून पुणे येथील मोदीबाग येथे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या नेतृत्वाखाली ३५ पदाधिका-यांनी शरद पवार यांच्यासमोर गावगाड्याच्या समस्याचे गा-हाणे मांडले. यानंतर पवारांनी आपण केलेल्या मागण्या रास्त आहेत. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत सरपंच परिषदेची बैठक लावु आणि तेथे ग्रामविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि मी या मागण्यासाठी स्वतः तिथे उपस्थित राहील असा शब्द शरद पवार परिषदेच्या शिष्टमंडळाला दिला.याप्रसंगी खालील मागण्या करण्यात आल्या त्यात प्रामुख्याने यावेळी सरपंच,उपसरपंच,सदस्य यांचे रुपये १० हजारा पर्यंत मानधन वाढ, पेन्शन,मोफत एसटी सेवा, मंत्रालय कायम प्रवेश पास ,मुंबईत सरपंच भवन, जि.प./ पं.स. मध्ये सुसज्य सरपंच कक्ष ,१५ लाखाच्या आतील विकास कामांचा मक्ता ग्रामपंचायतना द्यावा, ग्रामपंचायतसाठी आपत्कालीन व राखीव निधीसाठी १० लाख तरतूद,ग्रामीण आवास योजनेस घर बांधणीस २.५० लाख मिळावे आदी मागण्याचा समावेश होता.याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस राजाराम पोतनीस, राज्यविश्वस्त तथा कोषाध्यक्ष आनंद जाधव, कोअर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय बापू जगदाळे राज्य कोअर कमिटी सदस्य जे. डी. टेमगिरे, अरुणभाऊ कापसे, संजय शेलार, शत्रुघन धनवडे, अंबादास गुजर,गोविंद गायकवाड, ॲड दयानंद पाटील,अभिजीत पाटील , युवराज पाटील , लखन पाटील, संदीप कांबळे, पंढरीनाथ भोपळे, जी.डी.गुरव, जोशना पाटील,शिवाजी कांबळे (करवीर ) , बी.एम. पाटील (भडगावकर) शिवाजी पाटील (कासारी) जयसिंग पाटील (सोनगे ) आदिंचा समावेश होता.

-----------

### आरक्षणप्रश्नी गर्जना करणाऱ्या

बोलताना नाना पटोले म्हणाले की, आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजपाने राज्यातील जाती-जातीत भांडणे लावण्याचे पाप केले आहे. शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा संपवण्याचे काम केले आहे. आरक्षणाच्या प्रश्नावरून भाजपाने मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल करुन सामाजिक एकोप्याला बाधा पोहचवली आहे. आरक्षणावर सत्तेत बसलेल्या लोकांना निर्णय घ्यायचा असताना ते विरोधी पक्षांनाच विचारत आहेत. काँग्रेस पक्षाची आरक्षणावर भूमिका स्पष्ट असून, जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा हटवली पाहिजे असे राहुल गांधी यांनी जाहिरपणे सांगितले आहे आणि हे काम केंद्र सरकारचे आहे त्यामुळे केंद्रातील भाजपा सरकारने त्यावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. राज्यात व केंद्रात काँग्रेसचे सरकार आल्यास आरक्षणाचा प्रश्न सोडवू. मराठा समाजातील प्रतिनिधींच्या भेटीबद्दल बोलताना नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवनमध्ये मराठा समाजातील लोकांनी भेट घेतली असताना त्यांच्यासमोर पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. आता पुन्हा कोणी भेटणार असतील तर त्यांचेही स्वागत आहे. त्यांच्याशीही चर्चा करु असेही त्यांनी सांगितले.

--------------

### बीड मध्ये बुंदेलपुरा मस्जिद मध्ये राडा,

पेठ बीड भागातील महेबूब खान आणि जमील गुत्तेदार यांचे गेल्या अनेक दिवसापासून भांडण सुरु होते. महेबूब खान याच्या मुलाने मंगळवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जमील गुत्तेदार आपल्या भावांसह नमाज साठी मस्जिद मध्ये जात असताना त्यांच्यावर हल्ला केला. नमाज सुरु असताना हा प्रकार झाल्याने उपस्थित लोक तातडीने धावले, त्यानंतर आरोपी फरार झाले. या घटनेत जमील गुत्तेदार व इतर दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, पवित्र अशा मस्जिद मध्ये नमाज सुरु असताना घुसून तलवार, चाकू, लाठ्या काठ्या चा वापर करून या पवित्र स्थळाला बदनाम करणाऱ्या आरोपींना तातडीने अटक करा, अशी मागणी समाजातील नागरिकांनी पोलिसांकडे केली आहे.

-------------

### आमदार अपात्रता प्रकरणाची

शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत १६ आमदारांवर अपात्रतेची कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली होती, त्यानंतर सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवले, राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणात निकाल देताना शिवसेनेच्या एकाही आमदारावर अपात्रतेची कारवाई केली नाही. दुसरीकडे राष्ट्रवादीमध्ये फूट पडली त्या प्रकरणात देखील राहुल नार्वेकर यांनी असाच निकाल दिला. त्यामुळे पुन्हा एकदा या निकालाविरोधात शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणावर मंगळवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली आणि ही अपात्रतेची सुनावणी तीन आठवडे पुढे ढकलण्यात आली. आमदार अपात्रता प्रकरणात आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता शिवसेनेकडून करण्यात आली आहे, मात्र दुसरीकडे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाकडून अद्याप कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली नाही, त्यांच्या वकिलांनी कागदपत्र सादर करण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ वाढवून द्यावा, अशी विनंती केली होती, ही विनंती न्यायालयाने मान्य केली असून, या प्रकरणातील सुनावणी आता तीन आठवडे पुढे ढकलण्यात आली आहे.

--------------

### सचिन शिंदे

उपचार सुरु होते. अखेर त्यांची मृत्यूशी असलेली झुंज संपली असून सोमवारी त्यांची प्राणज्योत मालवली. मंगळवारी सकाळी दिंद्रुड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, बहिण, भाऊ, दोन मुली असा परिवार आहे. उद्योजक नितीन शिंदे यांचे ते भाऊ होत.

---------------

### बांगलादेशात हिंदू धोक्यात,

आला आहे. बांगलादेशमध्ये जेव्हा परिस्थिती अस्थिर होते, तेव्हा त्यांचे पहिले लक्ष हिंदू मंदिर असतात. सध्या हिंदू लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ते घराला आतून कुलूप लावून राहात आहेत. त्यांच्यावर कधीही हल्ला होऊ शकतो.

------------

## आझाद क्रांती सेनेच्या सादोळा सर्कल अध्यक्षपदी अमीन शेख



**माजलगाव । प्रतिनिधी**

आझाद क्रांती सेनेचे मुख्य कार्यालय माजलगाव येथे उच्चशिक्षित आमीन शेख नावाच्या तरुण तडफदार युवकांची सादोळा सर्कल अध्यक्षपदी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे,कैलास गायकवाड व राहुल गायकवाड यांनी निवड केली,या निवडी दरम्यान सादोळा सर्कल मधील प्रत्येक गावागावांमध्ये जाऊन आपण आझाद क्रांती सेनेचा विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं कार्य व संघटन बांधण्याचे काम कराल व महापुरुषांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचण्याचं काम करून शोषित वंचित उपेक्षित समाजाला न्याय समता स्वातंत्र्य बंधुत्व वरील आधारित देशाचे संविधान देशाची लोकशाही व अखंडता कायम अभाधित राखण्यासाठी जागृतीचा अग्निकुंड हमेश तेवत ठेवाल अशी अपेक्षा आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी शुभेच्छा प्रसंगी बोलून दाखवली अमीन शेख हे उच्च शिक्षित असून ते समाजाला नक्कीच न्याय देतील असे या वेळी मत व्यक्त केले व अमन शेख यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ७ ऑगस्ट २०२४
३

# 'प्रसारण सेवा नियमन विधेयक' या नावाखाली केंद्र सरकार अभिव्यक्ती व विचार स्वातंत्र्याचा गळा घोटण्याच्या तयारीत!

**मुंबई । प्रतिनिधी**

'प्रसारण सेवा नियमन विधेयक ' असे नाव धारण करून केंद्र सरकार डिजिटल मिडीया आणि यूट्युब चॅनलचा आवाज बंद करणारे ब्रॉड कॉस्ट बील आणण्याच्या तयारीत असून हे विधेयक डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणास दिलेल्या अभिव्यक्ती विचार स्वातंत्र्याचा गळा घोटणारे आहे , याचा फटका सामान्य जनतेलाही बसणार आहे . या सरकारी कटाच्या विरोधात पत्रसृष्टी व जनतेने नव्या लढ्यासाठी सिध्द व्हावे असे आवाहन अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी केले आहे.

एस एम देशमुख यांनी आपल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, आणीबाणीत माध्यम स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचा प्रयत्न झाला तेव्हा आम्ही विरोध केला, १९८२ ला जगन्नाथ मिश्र यांनी बिहार प्रेस बिल आणले त्याविरोधात आम्ही तुरूंगात गेलो..आता पुन्हा एकदा तशी वेळ येतेय..केंद्र सरकार डिजिटल मिडिया आणि युट्यूब चॅनल्सचा आवाज बंद करणारे ब्रॉडकास्ट बिल आणत आहे.. प्रसारण सेवा नियमन विधेयक असं नाव धारण करणाऱ्या या विधेयकात 'युट्यूब' चॅनल्सचा आणि एकूणच डिजिटल मिडियाचा गळा घोटण्याची पूर्ण तजविज करण्यात आलीय.. ३० वर्षापुर्वी आलेल्या केबल टीव्ही नेटवर्क ॲक्टची जागा हे विधेयक घेणार आहे म्हणे.. या कायद्याचा फटका डिजिटल मिडिया, सोशल मिडिया, ओटीटी प्लॅटफॉर्म, वैयक्तिक कंटेंट क्रियेटर अशा सर्वांना बसणार आहे.. तुमचं युट्यूब चॅनल नसेल मात्र तुम्ही बातमीशी निगडीत कंटेंट इन्स्टावर, ट्यूटरवर टाकत असाल आणि ते सरकारला आक्षेपार्ह वाटत असेल तर तुमचा आवाजही बंद केला जाऊ शकतो.. तुमच्या घरावर धाड टाकून सारं साहित्य जप्त केलं जाऊ शकतं.. चॅनल बंद करून तुम्हाला अटकही होऊ शकते.. देशाची एकता, एकात्मता, सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी हा कायदा केला जातोय असं तद्न चुकीचं समर्थन सरकारतर्फे केलं जातंय... मात्र हे खरं नाही डिजिटल मिडियाचा सरकारनं धसका घेतलाय हे वास्तव आहे.. लोकसभा निवडणुकीत भाजपची जी वाताहत झाली त्याला सोशल आणि डिजिटल मिडिया जबाबदार आहे हे मोदी - शहांचं आकलन आहे.. त्यातून दोघे डिजिटलवर संतापले आहेत.. पंधरा वीस भांडवलदारांच्या हाती एकवटला आहे.. माध्यमांच्या या एकाधिकारशाहीमुळे सरकारचं काम



सोपं झालं.. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिन्ट मिडियाला गोदीत घेऊन त्यांचा आवाज बंद करण्याचं काम सरकारनं केलं.. गोदी मिडियानं निवडणूक काळात आणि नंतरही आपल्या मालकांची इमानेइतबारे सेवा केली.. डिजिटल मिडियानं सरकारची सारी पोलखोल केली .. राहूल गांधींच्या दोन्ही यात्रा असतील, खेळाडू मुलींचं आंदोलन असेल, शेतकऱ्यांचा दिल्ली घेराव असेल, किंवा १४६ खासदारांचं निलंबन असेल या सर्व घटनांकडे मुख्य प्रवाहातील माध्यमांनी दुर्लक्ष केलं.. नरेंद्र मोदींचा अहंकार आणि अमित शहांची अरेरावी गोदी मिडियानं जगासमोर येऊ दिली नाही.. हे सारं डिजिटलमुळं जगाला कळलं.. प्रेक्षक आणि वाचक मोदी दर्शन आणि

### नव्या लढ्यासाठी सिद्ध होण्याचे एस.एम.देशमुख यांचे पत्रसृष्टीस आवाहन

मोदी महिमा ऐकून गोदी मिडियाला कंटाळले होते.. अनेकांनी टीव्ही चॅनल्स पाहणं बंद केलं.. त्यांनी आपला मोर्चा मग युट्यूब चॅनल्सकडे वळवला.. त्यामुळे रवीशकुमार, पुण्यप्रसून वाजपेयी, ध्रुव राठी, अभिसार, संजय शर्मा, निखिल वागळे यांच्या युट्यूब चॅनल्स चे सबस्क्रायबर कोटीत गेले.. त्यांच्या माध्यमातून लोकांना दुसरी बाजू कळू लागली.. रवीशकुमार जे बोलतात ते लोकांना आवडायला लागलं.. लोकांवर त्यांचा प्रभाव पडायला लागला.. हे सारं सरकारच्या डोळ्यात खुपणं अगदीच स्वाभाविक होतं.. त्यातून या माध्यमाचा गळा घोटण्याची योजना पुढं आली.. देशभर पसरलेल्या डिजिटल मिडियाला मॅनेज तर करणं शक्य नव्हतं.. त्यामुळं कायदयानंच या माध्यमाचा ''बंदोबस्त'' करण्याचा कट रचला गेला.. विधेयकाचा मसुदा तयार झाला आहे.. हे विधेयक कोणत्याही क्षणी संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडलं जाऊ शकतं.. या विधेयकाला सर्वच विरोधी पक्षांनी विरोध केला आहे.पण हे विधेयक मंजूर झालं तर काय होईल..? बघा मी काय बोलायचं? किती बोलायचं?आणि आपण काय ऐकायचं? हे सरकार ठरवणार आहे.. हे विधेयक माध्यमांसाठी आणीबाणी आणि बिहार प्रेस बिला पेक्षाही जास्त हानीकारक असलयानं केवळ पत्रकारच नाही तर लोकशाही प्रेमी आणि माध्यम स्वातंत्र्याबद्दलची चाड असणारया सामांन्य जनतेनं ही विधेयकास विरोध केला पाहिजे.. बिहार प्रेस बिलाच्या वेळेस जनता पत्रकारांबरोबर होती त्यामुळे बिहार सरकारला ते काळे विधेयक मागे घ्यावे लागले.. या ब्रॉडकास्ट नावाच्या काळ्या विधेयकाच्या विरोधातही जनतेनं आम्हाला साथ दिली पाहिजे..असं झालं नाही तर ''गोदी जनता'' हा नवा वाक्प्रचार तयार होईल.. हे विधेयक डॉ. आंबेडकरांनी आम्हाला दिलेल्या विचार स्वातंत्र, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाच गळा घोटणारे आहे.. याचा फटका सामांन्य जनतेलाही बसणार आहे..या विरोधात इतर संघटनांना सोबत घेत मराठी पत्रकार परिषद, डिजिटल मिडिया परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आवाज उठविणार आहेच.जनतेचा आवाज बंद करण्याच्या सरकारी कटाच्या विरोधात आम्हाला. तुम्हा सर्वांची साथ हवी आहे. असे आवाहन एस.एम. देशमुख यांनी केले आहे.



पिंपळवंडी:- पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथे संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळ्यातील तीन दिवसीय सप्ताह सोहळ्यात सोमवार दि.०५/०८/२०२४ रोजी रात्री ८ ते १०:३० या वेळेत ह.भ.प.वाणीभूषण ज्ञानेश्वरजी महाराज तांबे नेवासा यांचे सुश्राव्य मोलाचे मार्गदर्शन करणारे किर्तन संपन्न झाले.त्यांनी किर्तनातून शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन परमार्थ कसा करावा याचे मार्गदर्शन करून आई-वडिलांनी मुलावर चांगले संस्कार करून त्यांना आदर्श घडवावे असा मौलिक सल्ला दिला.या किर्तनाचा भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घेतला.तसेच हे युग यांत्रिक व वैज्ञानिक आहे.अंधश्रद्धेला सर्वांनी फाटा दिला पाहिजे.अंधश्रद्धेवर विश्वास ठेवू नका.तरुणांनी व्यसनापासून दूर राहून बुद्धीचा योग्य वापर करण्याचा संदेश दिला.

## नायगांवचा अभिजित मुजमुले याची सामान्य कुटुंबातून यशाला गवसणी

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे नायगांव येथील अभिजित महादेव मुजमुले याची भूमी अभिलेख विभागात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल या पदासाठी निवड झाली आहे.त्याच्या या निवडीबद्दल सर्वच स्तरामधून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



अभिजित मुळातच होतकरु असल्याने स्पर्धा परीक्षेत सातत्य राखत शासकीय सेवेचे त्याचे स्वप्न साकार झाले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन सर्वसामान्य कुटुंबातून मेहनतीने हे यश मिळवले.त्याचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर पॉलीटेकनिकचे शिक्षण योगेश्वरी कॉलेज अंबाजोगाई आणि सिव्हिल इंजिनियरिंग-बी टेक हे अहमदपूर येथे पुर्ण झाले.मात्र शिक्षण पुर्ण झाले परंतु मनातील शासकीय सेवेचे स्वप्न शांत बसू देत नव्हते. त्यामुळे २०२३ पासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केला, त्याने अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द न सोडता सातत्यपूर्ण अभ्यास करत भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत अभिलेखापाल पदी त्याची निवड झाली. अभिजीतने हे यश आपल्या अभ्यासातील सातत्य, चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.ते पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांचे लहान बंधू आहेत.

## बायपास रोडवरील हॉटेल सुखसागर व संजिवनी हॉस्पीटल समोर तात्काळ गतिरोधक बसवा -पांचाळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील बायपास रोडवर अपघाताचे प्रमाण वाढले असून होणाऱ्या अपघातामुळे नागरीकांची जिवीत आणि वित्तहाणी टाळण्यासाठी हॉटेल सुखसागर समोर आणि संजीवनी हॉस्पीटल समोरील रोडवर तात्काळ गतीरोधक बसवण्याची मागणी विश्वकर्मा सुतार संघटनेचे अध्यक्ष परमेश्वर पांचाळ यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या सह आमदार प्रकाश सोळंके यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.



माजलगाव शहरातील बायपास रोड लगतच छ. संभाजी महाराज चौक, चिंचगव्हाण, देवखेडा, पुनंदगाव, अशी गावे असून सदरील गावांना बायपास रस्ता जोडलेला आहे. तसेच बायपास रोडवर मोठमोठी दवाखाने , हॉटेल्स , शॉपिंग मॉल्स देखील आहेत त्यामुळे सदर रोडवर मोठ्या प्रमाणात लोकांची वर्दळ असते. या रोडवर मोठ्या प्रमाणात दूचाकी वाहने , चारचाकी वाहने , अवजड वाहने , स्कुल बसेस वाहतुक करत असून या रोडवर गतिरोधक नसल्यामुळे तीन - चार वर्षापासून या रोडवर मोठ्या प्रमाणात अपघात झाले असून यामध्ये काही माणसे व विद्यार्थी मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे या बायपास रोडवरील हॉटेल सुखसागर व संजिवनी हॉस्पिटल समोरील रोडवर तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी उपविभागीय अधिकारी माजलगाव सह आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष परमेश्वर पांचाळ यांनी गावकऱ्यांच्या वतीने निवेदनाव्दारे केली आहे या निवेदनावर गावकऱ्यांच्या सहया आहेत.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकारांनी करावे-रामहरी राऊत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकारांनी करावे,असे आवाहन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे महाराष्ट्र राज्य प्रमुख रामहरी जिजाबाई भीमराव राऊत यांनी आज अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केले आहे.

ते बोलताना म्हणाले की,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैद्यकीय सहाय्यता योजनेच्या माध्यमातून समाजपयोगी कार्य हाती घेतले आहे.संबंधित योजनेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी टोलफ्री नंबर दिला आहे.आवश्यक असणारी कागदपत्रांची पुर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी पत्रकारांसोबत बोलताना केले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी




योजना संपूर्ण भारत देशामध्ये सर्व राज्यांमध्ये संकटग्रस्तांसाठी, आपत्तीग्रस्तांसाठी राबवण्यात येणारी एक आर्थिक सहाय्यता प्रदान करणारी योजना आहे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी मार्फत देशातील तसेच महाराष्ट्र राज्यातील संकटग्रस्तांना, आपत्तीग्रस्तांना आर्थिक सहाय्यता पुरविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे, पूर ,अतिवृष्टी ,दुष्काळ ,आगीमुळे होणारे अपघात अशा नैसर्गिक संकटांमुळे,आपत्तींमुळे नुकसान झालेल्या बाधित नागरिकांना तसेच नैसर्गिक संकटांमुळे,आपत्तींमुळे मरण पावलेल्या किंवा दुखापत झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना मुख्यमंत्री सहाय्य्यता निधीमार्फत आर्थिक पाठबळ, मदत, सहाय्य्यता प्रदान केली जाते पुरविली जाते.

सदर योजनेतून उपचार अंबाजोगाईतील शासकीय रुग्णालयात तसेच शहरातील काही खाजगी दवाखान्यात घेता येईल. असे ही,बोलताना राऊत म्हणाले.संबंधित रुग्णालयांच्या नावाची यादी शहर प्रमुख ऋषी लोमटे यांच्याकडे उपलब्ध होईल.तेव्हा या योजनेची माहिती पत्रकारांनी आपल्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम करावे असे आवाहन करण्यात आले.

आज सकाळी ११ वाजता अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत शिंदे गटाचे शिवसेना जिल्हाउपप्रमुख गजानन मुडेगावकर, तालुका प्रमुख अर्जून वाघमारे,शहर प्रमुख ऋषीभैय्या लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ऊस पिकाचे वेळीच करा अन्नद्रव्य कीड-रोग व्यवस्थापन

### ऊसाचे काणीग्रस्त बेट शेतातून काढून नष्ट करा : शिवप्रसाद येळकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सद्यस्थितीत काही ठिकाणी आडसाली ऊस पिकामध्ये पोंगे मर किडीचा तसेच चाबूक काणी रोगाचा प्रादुर्भाव थोड्या प्रमाणात आढळून येत आहे. या किडींच्या व्यवस्थापनाची माहिती शेतकऱ्यांना देण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड रांजणीचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी ममदापूर, देवळा, आवाड शिरपुरा आदी गावातील शेतकऱ्यांच्या प्लॉटला भेटी देऊन शेतकऱ्यांना कीड आणि रोगाची निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनाच्या उपायोजना सुचवल्या. ऊसावरील पोंगे मर व्यवस्थापनासाठी क्लोरअँट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एस.सी.) ०४ मिली किंवा फिप्रोनिल (५ टक्के एस.सी.) २० मिली यापैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. ऊस पिकामध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाला असल्यास रासायनिक व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४० टक्के अधिक फिप्रोनिल ४० टक्के (८० डब्लू जी) या पूर्व मिश्रित संयुक्त कीटकनाशकाची १७५ ग्रॅम प्रती ४०० लिटर पाण्यामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रासाठी आळवणी करावी. काही ठिकाणी ऊस पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव शेताच्या बांधाच्या कडेने दिसत



आहे याच्या व्यवस्थापनासाठी बाधित पान तोडून जमिनीत गाडून मावा नष्ट करावा. ऊस पिकामधील चाबुक काणी रोग व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त उसाचे फुटवे विळ्याने कापून घेऊन त्याची काजळी शेतामध्ये पडू न देता व्यवस्थित प्लास्टिकच्या पोत्यात भरून शेता बाहेर नेऊन जाळून टाकावेत त्यानंतर जमिनीखाली राहिलेले उसाचे बेट इतर अवशेष काढून नष्ट करावेत यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. काणी रोगाच्या प्रादुर्भाव व्यवस्थापनासाठी अॅझॉक्सीस्ट्रॉबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. उसावर पोक्का बोंग व शेंडा कूज रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यावर व्यवस्थापनासाठी एक ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. काही ठिकाणी चुनखडी युक्त पांढऱ्या जमिनीवर सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे ऊस पिकाची पाने पिवळी पडत असल्याचे निदर्शनास येत आहे ही सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता म्हणजेच क्लोरोसिस (हरितरोग) ही विकृती असून याच्या व्यवस्थापनासाठी १३:४०:१३ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक मॅग्नेशियम सल्फेट दोन ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्य दोन ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यातून फवारणी करावी याची माहिती येळकर यांनी दिली.

## डीजेच्या तालावर नाचण्यापेक्षा किर्तनात रंगलं तर जीवनाचं सार्थक होईल, संत भगवानबाबा अवतारी संत होते-ह.भ.प.समाधान महाराज शर्मा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ भगवानबाबांनी तत्कालीन काळात समाजातील अठरापगड जातीधर्माला सोबत घेवुन वारकरी संप्रदायाच्या माध्यमातुन केलेले कार्य अलौकिक होय. संतांना मुळात जात नसते. सहनशीलता आणि शांतता याचं प्रतिक म्हणजे संत होय. डिजेच्या तालावर नाचण्यापेक्षा किर्तनात मन रंगलं तर खर्या अर्थाने जीवनाचे सार्थक होतं. माता-भगिनींच्या गळ्यात मंगळसुत्र असेल तरच पतीचं नाव घेता येतं. त्याचप्रमाणे तुळशीची माळ गळ्यात असेल तरच पांडुरंगाचं नाव घेण्याचा अधिकार प्राप्त होतो.या शब्दांत प्रसिद्ध किर्तनकार विनोदाचार्य समाधान महाराजांनी भाविकांना उपदेश केला.

संतश्रेष्ठ भगवानबाबा जयंती उत्सव समितीच्या वतीने येथील मुकूंदराज सभागृहात किर्तन आयोजित करण्यात



आले होते. प्रारंभी उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, श्री शेप यांनी प्रतिमापुजन केल्यानंतर सेवेला प्रारंभ झाला. प्रसंगी जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, राम कुलकर्णी, ॲड.शोभाताई लोमटे, संजय गंभीरे, माधवराव दहिफळे, नरसिंह सिरसाट, ठाकुर सुजितसिंह, शिवाजीराव गुट्टे, महेश शेप, प्रशांत गंभीरे, बाळुकाका बडे आदी मान्यवरांसह उत्सव समितीचे प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या किर्तने सेवेसाठी

आठवे देव तो करावा उपाय,
येर ते जीवा खटपट,
होई होई बा जागा,
का उगासी शिनसी

या द्वारे वेगवेगळे धार्मिक कार्यसिद्धीचे उदाहरण देवुन समाधान महाराजांनी परमेश्वर भक्ती किती महत्वाची आहे?आणि साधु संत देवाकडे जाण्यासाठी उत्तम साधन असल्याचे विषद केले. संत कुणाला म्हणावं? ज्यांनी आयुष्यात संघर्ष करत समाजातील लोकांच्यासाठी जनजागृती आणि वारकरी संप्रदायाची बीजे रूजवली. संत भगवानबाबाकडे पाहिल्यानंतर लक्षात येतं की संत म्हणजे शांततेचे प्रतिक पण सहनशीलतेचा समुद्र. अलीकडच्या काळात लोक किर्तनकार विकत घेवु शकतील मात्र किर्तन तुम्हाला कधीच विकत घेता येणार नाही हे सांगताना त्यांनी अनेक धार्मिक उदाहरणे दिली. र्हदयातुन देवाला जपा. देव माझा आहे खुणगाठ मनाशी ठेवा आणि परमेश्वराची भक्ती करा. संताला आपण गुरूस्थानी का म्हणतो? कारण आपलं आयुष्य बदलुन टाकण्याची ताकद संतांमध्ये असते. त्याचं कारण संताला कुठलीही जात नसते. त्यांचा सन्मान करायला हवा. कारण संत म्हणजे परमेश्वराचे रूप असतं. ज्या काळात भगवानबाबाच्या माध्यमातुन सर्वांना कळुन चुकलं. तुळशीची माळ गळ्यात ठेवा. तिचे पावित्र्य राखा. जो खरा माळकरी आहे. तो आपल्या गळ्यातील माळ कधीच कुणाला दाखवत नाही. कारण र्हदयी पांडूरंग असतो. आयुष्य जगताना बाकीचे कुटाणे जर बंद केले आणि सत्संग मार्गाने शुद्ध कर्माने जीवन जगलो तर खर्या अर्थाने कुठलीही कमतरता आपल्या आयुष्यात भागत नाही. संसार जीवन स्वार्थी असं म्हणायला हरकत नाही. पण या भुमिकेत सुद्धा आपण जर खर्या अर्थाने परमेश्वराची ध्यानधारणा केली तर मिळणारा आशिर्वाद जीवन यशस्वी करण्यासाठी कामी येतो. समाधान महाराजांनी दोन तासाच्या सेवेत भीमसिंग महाराजासह ढोक महाराजांच्या आवाजात देखील भावस्पर्श सेवा केल्यानंतर भाविक भक्तांनी टाळ्या वाजवुन त्यांचे स्वागत केले.

## गोसावी समाजाचे प्रश्न, अडीअडचणी सोडवतील त्यांच्या पाठीमागे समाजाची ताकद उभी करू - अमित गिरी

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील, व मतदारसंघात दशनाम गोसावी समाजाचे प्रश्न, विविध अडचणी मार्गी लावण्याचे काम आतापर्यंत कोणीही करत नसल्याचे वारंवार निदर्शनात आले आहे. परंतु या विधानसभेच्या वेळी किंबहुना आम्ही असे चालू देणार नाही. गोसावी समाजातील युवकांचे, लोकांचे अनेक प्रश्न असतात त्यांचे प्रश्न कुणीही मार्गी लावत नाही. माजलगांव मतदार संघातील ग्रामीण भागात काही ठिकाणी अद्याप पर्यंत गोसावी समाजासाठी स्मशानभूमी सुद्धा नाही. व आमच्या गोसावी समाजासाठी मतदारसंघातील कोणते ही राजकीय नेते काम करताना दिसलेले नाहीत. गोसावी समाज सुद्धा मतदारसंघातील विधानसभेच्या उमेदवाराला आमदार करण्यास समाजाचाही खूप मोठा सिंहाचा वाटा असतो. मतदारसंघातील नेते गोसावी



समाजाचा विचार करत नाहीत. मतदारसंघात गोसावी समाजाच्या मतदारांची ताकद ही बहुसंख्य असल्यामुळे आमचा सुद्धा विचार करावा लागेल. जे आमच्या समाजाचे अडीअडचणी, प्रश्न मार्गी लावतील त्यांच्याच पाठीमागे मतदार संघातील समाजाची संपूर्ण ताकद उभी करू व जे माझ्या गोसावी समाजासाठी काम करेल त्यांच्या साठी आम्ही वैयक्तिकरित्या ही जीवाचे रान करू व मतदार संघातील गोसावी समाजाची ताकद उभी करू असे गोसावी समाजाचे, अमित गिरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले.

# कृषी उत्पादनांच्या भौगोलिक मानांकनात महाराष्ट्राचा पहिला नंबर

## एकूण ३८ शेती उत्पादनांना मिळालाय टॅग

देशभरातील कृषी उत्पादनांना दिल्या जाणाऱ्या भौगोलिक मानांकनात महाराष्ट्राला पहिला नंबर मिळालाय! भारतातील एकूण २०० कृषी उत्पादनांपैकी राज्यात ३८ कृषी उत्पादनांना हा जीआय टॅग देण्यात आला आहे. कृषी मालाची विशेष ओळख आणि खास गुणवत्ता यांचे जतन करण्यासाठी भौगोलिक मानांकन देण्यात येतं. कृषी उत्पादनांच्या भौगोलिक मानांकनात महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे.

काय फायदा होतो जीआय टॅगचा?

एखादे उत्पादन विशिष्ट भागातच घेतले जात आसेल आणि त्या उत्पादनाला काही विशिष्ट ओळख असेल तर त्याला भौगोलिक मानांकन दिले जाते. कोणत्याही उत्पादनाला भौगोलिक मानांकन मिळाल्यास त्या उत्पादनाचे उगमस्थान निश्चित होते.भौगोलिक मानांकन प्राप्त पिकाच्या कार्यक्षेत्रातील संबंधित पिकाच्या उत्पादकांची भौगोलिक संकेत (नोंदणी व संरक्षण) अधिनियम १९९९ अंतर्गत अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी केल्यास भोगोलिक चिन्हांकनाचा लोगो लावून उत्पादनाची विक्री करता येते.




पिकाच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांची ओळख निर्माण करुन विक्री केल्यास उत्पादकास अधिकची किंमत मिळते. राज्याला लाभलेले वैशिष्ट्यपूर्ण वातावरण व नैसर्गिक जैवविविधतेमुळे नवीन कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त करण्यास प्रचंड वाव आहे. देशातील नवीन पिकास भौगोलिक मानांकन अदा करण्याची कार्यवाही चेन्नई येथील भौगोलिक मानांकन रजिस्ट्री येथून करण्यात येते.

अधिकृत वापरकर्त्यांच्या नोंदणीमध्ये महाराष्ट्राचा वाटा ६१ %

कृषी उत्पादनाच्या देशात एकूण झालेल्या उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणीमध्ये महाराष्ट्राचा ६१ % वाटा आहे. तसेच ५००० प्रस्तावांना देखील लवकरच मान्यता मिळून अधिकृत वापरकर्ता नोंदणीत मोठी वाढ होणार आहे. राज्यात भौगोलिक मानांकन प्राप्त पिकाचे अधिकृत वापरकर्ता नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येते. सन २०१९-२० अखेर १२३२ उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणी झाली होती. संचालक फलोत्पादन विभागामार्फत उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याने सन २०२४ अखेर ११४२३ उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणी झाली आहे.

कायदेशीर संरक्षण आणि निर्यातसंधी

अधिकृत वापरकर्ता नोंदणीने भौगोलिक क्षेत्राशी निगडित मालास कायदेशीर संरक्षण प्राप्त होते. भौगोलिक चिन्हांकन मालास निर्यातीसाठी अधिक संधी उपलब्ध होतात, अशा नोंदणी करत कृषी मालास राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रँडींग होण्यास मदत होते.

व्यापारी चिन्हाला बाजारपेठेत जे महत्त्व असते तेच महत्त्व कृषिमालाच्या भौगोलिक चिन्हांकनासह असते, त्यामुळे असे नोंदणी केलेल्या उत्पादनाच्या उत्पादकाला जास्तीचे आर्थिक उत्पन्न मिळून त्याच्या उन्नतीस हातभार लागतो. भौगोलिक मानांकन प्राप्तीमुळे भारतीय कृषी निर्यातीस जागतिक बाजारपेठेत निश्चितच लाभकारक ठरणार आहे.

# भारतातील ५ लोकप्रिय लिचीच्या जाती; उत्पादन मिळते चांगले



जवळजवळ प्रत्येकाला लिची खायला आवडते, हे एक रसाळ तसेच स्वादिष्ट फळ आहे. या फळाची लागवड प्रामुख्याने भारत, चीन, बांगलादेश, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांमध्ये केली जाते. देशात लिचीचे सर्वाधिक उत्पादन बिहारमध्ये होते. शाही लिची, कसबा लिची, चायना लिची, लोंगिया लिची, बेदाणा लिची आणि ईस्टर्न लिची या बिहारमध्ये पिकवल्या जाणाऱ्या देशातील काही प्रमुख जाती आहेत. शाही लिचीला टॅग देखील देण्यात आला आहे. आणि ती चीनच्या लिचीच्या उशीरा सुधारलेल्या जातींपैकी एक आहे. तर बिहारमधील लोंगिया लिची हळूहळू नामशेष होत आहे. कसबा लिची ही उशिरा पिकणारी जात आहे. याशिवाय लिचीच्या बेदाणा जातीचे फळ अंडाकृती किंवा हृदयाच्या आकाराचे असते. बिहारमधील बहुतांश शेतकरी लिचीच्या लागवडीवर अवलंबून आहेत.

शाही लिची : बिहारची शाही लिची ही देशातील सर्वात लोकप्रिय लिचींपैकी एक आहे, त्याची लागवड प्रामुख्याने मुझफ्फरपूरमध्ये केली जाते. देशाच्या इतर भागातही शेतकरी या नावाने शेती करतात, पण मुझफ्फरपूर हे शाही लिचीच्या चांगल्या दर्जासाठी ओळखले जाते. या लिचीचा दर्जा लक्षात घेऊन तिला जीआय टॅगही देण्यात आला आहे. चायना लिची : लिचीची चायना जात ही उशिरा पिकणारी जात असून तिचा रंग गडद लाल असतो आणि फळाचा आकारही मध्यम असतो. या जातीच्या लिचीच्या फळामध्ये लगदाचे प्रमाण जास्त असते आणि प्रत्येक झाड सुमारे ८० ते ९० किलो उत्पादन देते. या लिचीचे वैशिष्ट्य म्हणजे याचे फळ पूर्ण पिकल्यानंतरही फुटत नाही. कसबा लिची : कसबा लिची ही बिहारमध्ये पिकणारी मध्य-उशीरा पिकणारी जात आहे. त्याची फळे गडद लाल रंगाची आणि अंडाकृती किंवा गोल असतात. मुझफ्फरपूरची लाँगिया लिची ही जात तडतडण्यास आणि सूर्यप्रकाशास प्रतिरोधक आहे. २५-३० वर्षांपूर्वीपर्यंत शाही आणि चायना लिचीसोबतच बागांमध्ये लोंग्याचेही पीक घेतले जात होते, परंतु आता ते नाहीसे झाले आहे. बेदाणा लिची : या जातीच्या लिचीचा आकार अंडाकृती किंवा हृदयासारखा असतो, पिकल्यानंतर त्याचा रंग हलका हिरवा तसेच लाल होतो. बेदाणा लिचीचा आकार मध्यम असतो, एका फळाचे वजन १५ ते १८ ग्रॅम असते. या लिचीचा गोड चव आणि रसाळपणासाठी बिहारमधील लोकप्रिय लिची जातींमध्ये समावेश केला जातो. पूर्व लिची : बिहारच्या पूर्व भागात लिचीच्या या जातीचे पीक घेतले जाते. पूर्वेकडील लिची फळाचा आकार मध्यम व मोठा असतो. या जातीची लिची पिकण्याची वेळ मे अखेरीस किंवा जूनचा पहिला आठवडा मानली जाते. बिहारच्या या पूर्वेकडील लिचीचा रंग गुलाबी आहे. शेतकऱ्यांना एका झाडापासून सुमारे ९० ते १०० किलो उत्पादन मिळू शकते.

# असे करा कपाशी पिकामधील पातेगळ नियंत्रण

कापूस हे एक नगदी पीक आहे. जगातील कपाशीखालील क्षेत्राच्या एक चतुर्थांश क्षेत्र भारतात कापूस लागवडीखाली आहे. भारताच्या महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात कापसाचे पीक घेतात. तसेच गुजरात, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांतही कापसाची लागवड केली जाते. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याला 'पांढऱ्या सोन्याचा जिल्हा' म्हणून ओळखल्या जाते. सध्या बहुतांश कापूस उत्पादक जिल्ह्यात कपाशीची पेरणी पूर्ण झाली आहे. सध्याचे बदलते हवामान पाहता परिणाम पिकांवर होत असून त्याच्या अन्नसाखळीत खंड पडतो आहे. कारण यामुळे जमिनीतील मूळ हे अन्नद्रव्ये घेऊ शकत नाही. परिणामी नैसर्गिकरीत्या कापसाच्या किंवा कोणत्याही पिकाची पातेगळ होते.


कापूस पातेगळ होण्यास कारणीभूत घटक : सुर्यप्रकाश कमी असणे,वाढलेले तापमान,पावसाचा खंड / जमीनीत ओल नसणे, ढगाळ हवामान इ. या घटकांमध्ये विपरीत बदल होतो. त्यामुळे झाडामध्ये तयार होणारे अन्नघटकाचे पात्या, फुले व बोंडे या भागांकडे वहन होण्यास अडथळा येतो व परिणामी त्यांची गळ होते. वाढलेल्या तापमानामुळे किंवा उमलणाया फुलांवर पाऊस पडल्यामुळे परागसिंचन आवश्यक त्या प्रमाणात होत नाही. तसेच फुलांवरील किडीमुळे पाते फुलांची गळ होते. उशीरा लागवड झालेल्या पिकामध्ये गळ होण्याचे प्रमाण अधिक आढळते. कोरडवाहू लागवडीमध्ये पावसाची दीर्घकाळ उघडीप असणे व त्याच्या जोडीला तापमानात झालेली वाढ यामुळे पातेगळ होते. महाराष्ट्र मध्ये लागवड जून-जुलै महिन्यात होते. सुरुवातीच्या काळात पाते लागण्याच्या वेळी जुलै -ऑगस्ट महिन्यात ढगाळ हवामानामुळे पिकाला सूर्यप्रकाश अपूरा मिळतो. त्याचप्रमाणे बोंडे लागण्याच्या काळात ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पावसाचा खंड पडल्यामुळे ओल कमी होते. या कारणांमुळे पाते, फुले व बोंडाची गळ होते.

कापूस पातेगळसाठी उपाय : पाणी जमिनीत साचणार नाही म्हणून जमीन उत्तम निचयाची असावी फुले लागण्याच्या अवस्थेत अधिक तापमान, ढगाळ हवामान किंवा पावसाचा खंड येणार नाही अशाप्रमाणे लागवड करावी.

पीक व्यवस्थापन : एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन द्वारे आवश्यक अन्नद्रव्यांचा पुरवठा करावा. फवारणीद्वारे विद्राव्य खतांचा योग्य वेळी वापर करावा. शरीर क्रियात्मक कारणांमुळे होणाऱ्या पातेगळ साठी २० पी पी एम नॅप्थॅलीन ॲसिटिक ॲसिड (एन ए ए) ची फवारणी करावी. संजीवकाची फवारणी करताना त्यात अन्य कोणतेही रसायन मिसळू नये. पाते लागणे ते फुले लागण्याच्या काळात २% डी ए पी (२०० ग्रॅम प्रति १० लिटर) खताची १-२ वेळा फवारणी करावी. एनएए व डीएपी च्या फवारण्या शक्यतो सकाळ किंवा सायंकाळी कराव्या. बागायती लागवडीमध्ये त्याचप्रमाणे नत्रयुक्त खते व वाढ संप्रेरकांचा वापर अधिक केल्यास काही वाणांमध्ये अवास्तव कायिक वाढ होते. अशावेळी पाने फुलांची गळ होऊ शकते. कायिक वाढ सिमीत ठेवण्यासाठी वाढ रोधक यांचा (मेक्काट क्लोराईड ५० पी पी एम- १२ मिली /१० लिटर) फवारणीद्वारे पाते लागताना वापर करावा. यामुळे कायिक वाढ कमी होऊन उपलब्ध ओलाव्याचा वापर पाते, फुले व बोंडे वाढीसाठी होईल.

विद्राव्य खतांचा वापर : फवारणीद्वारे विद्राव्य खते दिल्यास लवकर उपलब्ध होतात. पाते / बोंडे येण्याच्या अवस्थेमध्ये डि. ए. पी किंवा युरिया खताची २% (२०० ग्रॅम / १० लिटर) प्रमाणात फवारणी करावी. तसेच फुले लागणे व बोंडे भरण्याच्या काळात पोटॅशिअम नायट्रेट (१३:०:४५) २% प्रमाणात फवारणीद्वारे द्यावे.

रासायनिक पद्धत : सद्यस्थितीत सुरु असलेला पावसाने फुलात पाणी साचून बुरशी तयार होते त्यामुळे फुलगळ होते ते थांबवण्यासाठी बाविस्टीन हे बुरशीनाशक १५ ते २० ग्रॅम प्रती पंप कोणत्याही गरजेनुसार कीटकनाशकां सोबत फवारणी करा. त्याचप्रमाणे जमिनीत पाणी साचू न देता त्याला जमिनीच्या उतारानुसार बाहेर काढा.





## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५३ : साली ब्रिटीश वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली.
१७८९ : अमेरिकेच्या सरकारी युद्ध विभागाची स्थापना झाली.
१९४२ : दुसरे महायुद्ध प्रशांत महासागरातील 'ग्वाडेल कॅनाल' येथे अमेरिकन सैन्य उतरले व दुसर्या महायुद्धातील एक भीषण लढाई खेळली गेली. या घटनेतुनच जपानच्या माघारीस सुरुवात झाली.
१९४७ : थोर हायरडल व त्याच्या सहकाऱ्यांनी बाल्सा लाकडापासुन तयार केलेल्या 'कॉन टिकी' या तराफ्यातुन १०१ दिवसात पॅसिफिक महासागरात ७,००० किमी प्रवास केला.
१९४७ : मुंबई महानगरपालिकेने 'बेस्ट' कंपनी आपल्या ताब्यात घेतली.
१९८१ : सलग १२८ वर्षे प्रकाशित झाल्यावर 'द वॉशिंग्टन स्टार' हे वृत्तपत्र बंद पडले.
१९८५ : जपानचे पहिले अंतराळवीर म्हणून ताकाओ दोई, मोमोरू मोहरी आणि चीकी मुकाई यांची निवड केली गेली.
१९८७ : अमेरिका ते सोव्हिएत संघ पोहून पार करणारे लिन कॉक्स हे पहिले व्यक्ती बनले.
१९९० : गल्फ युद्ध साठी पहिले अमेरिकन सैनिक सौदी अरेबियात पोहोचले.
१९९१ : जमिनीवरुन हवेत मारा करणार्या 'पृथ्वी' या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोटा येथे तिसर्यांदा यशस्वी चाचणी
१९९७ : चित्रपट निर्माते गौतम घोष यांना इटालियन दिग्दर्शक सिका यांच्या नावाने दिला जाणारा 'व्हिट्टोरिओ डी सिका' हा सन्मान जाहीर
१९९८ : अतिरेक्यांनी दार-ए-सलाम, टांझानिया व नैरोबी, केनिया येथील अमेरिकन वकिलातींवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात २१२ लोक ठार झाले.
२००० : ब्रिटिश बुद्धिबळ स्पर्धेत नऊ वर्षाखालील गटात भारताच्या संकल्प मोदवलने संयुक्त विजेतेपद मिळवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : चर्च ऑफ इंग्लंडचे एक मौल्यवान, शालेय शिक्षक आणि लेखक तसचं, केंब्रिज ॲपोस्टल्स सीक्रेट सोसायटीचे सदस्य फ्रेडरिक फरार यांचा जन्मदिन.
१८७१ : अवनींद्रनाथ टागोर जलरंगचित्रकार, रविंद्रनाथ टागोर यांचे काका, जलरंगातील त्यांचे वेगळे निर्मितीतंत्र हा आधुनिक भारतीय कलेच्या सुरुवातीच्या काळातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. (मृत्यू: ५ डिसेंबर १९५१)
१८७६ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (मृत्यू: १५ आक्टोबर १९१७)
१९०४ : प्रसिद्ध भारतीय इतिहास, सांस्कृतिक कला व साहित्याचे विद्वान वासुदेव शरण अग्रवाल यांचा जन्मदिन.
१९१२ : केशवराव कृष्णराव दाते हृदयरोगतज्ज्ञ (मृत्यू: )
१९२५ : डॉ. मनकोम्बू साम्बसिवन तथा एम. एस. स्वामीनाथन भारतीय शेतीतज्ज्ञ, हरितक्रांतीचे जनक आणि केन्द्रीय कृषी मंत्री, हरित क्रांतीद्वारे भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण बनवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. जगभरातील सुमारे ४२ विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टरेट' ही पदवी दिली आहे. याखेरीज पद्मश्री, पद्मभूषण व पद्मविभूषण या सन्मानांखेरीज, रॅमन मॅगसेसे, वर्ल्ड फूड प्राइझ व इतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलेले आहे.
१९३६ : दोन वेळा अश्डन पुरस्कार विजेते डॉ. आनंद कर्वे यांचा जन्म.
१९४८ : ग्रेग चॅपेल ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९६६ : विकिपीडियाचे सह-संस्थापक जिमी वेल्स यांचा जन्म.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : जेकब बर्झेलिअस स्वीडीश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० ऑगस्ट १७७९)
१९३४ : जॅक्वार्ड लूम चे शोधक जोसेफ मॅरी जाकॉर्ड यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १७५२)
१९४१ : रविंद्रनाथ टागोर कवी, लेखक, कलावंत, तत्त्वचिंतक आणि शिक्षणतज्ज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते भारतीय लेखक. 'जन गण मन ' हे भारताचे राष्ट्रगीत त्यांनी लिहिले आहे. (जन्म: ७ मे १८६१)
१९७४ : अंजनीबाई मालपेकर भेंडीबाजार घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म:)
२००९ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील गीतकार आणि अभिनेते गुलशन बावरा यांचे निधन.
२०१८ : भारतीय लेखक आणि राजकारणी तसचं, तामिळनाडू राज्याचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन.

# गोगलगायींच्या समस्येवर एकात्मिक नियंत्रण

महाराष्ट्रातील अनेक भागात गोगलगायीची समस्या जास्त प्रमाणात निर्माण होत आहे. मुख्यत: ओलसर वातावरणात आढळणारी गोगलगाय शेतीचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान करते. या लेखात आपण गोगलगायींमुळे होणारे नुकसान आणि त्यांच्या नियंत्रणासाठी सांस्कृतिक, भौतिक, जैविक, आणि रासायनिक उपायांची माहिती घेणार आहोत.

गोगलगायींमुळे होणारे नुकसान : महाराष्ट्रातील शेतकरी गोगलगायींच्या समस्येमुळे खूप त्रस्त आहेत. गोगलगाय ओलसर आणि आर्द्र वातावरणात वाढतात, ज्यामुळे पावसाळ्याच्या काळात त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. गोगलगाय खालील प्रमाणे नुकसान करते. गोगलगाय पिकांच्या पानांना खाऊन टाकते, ज्यामुळे पिकांचे उत्पादन कमी होते. हे कीटक रात्रभर पिकांवर आक्रमण करतात आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. हे कीटक विशेषत: पिकांच्या कोवळ्या भागांना जास्त हानी पोहचवतात. त्यांच्यामुळे निर्माण झालेले



पानांवरील छिद्रं, खाऊन टाकलेल्या देठांमुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होतो आणि आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. गोगलगायींनी पिकांना इतकी मोठी हानी पोहचवली आहे की, उत्पन्नात ३०-४०% घट झाली आहे. हे कीटक केवळ पिकांच्या कोवळ्या भागांना नष्ट करत नाहीत, तर मुळांनाही हानी पोहचवतात, ज्यामुळे पिकांची वाढ थांबते.

गोगलगायींवर नियंत्रण करण्याचे एकात्मिक उपाय : गोगलगायींवर नियंत्रण मिळवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करता येतो. यामध्ये सांस्कृतिक, भौतिक, जैविक, आणि रासायनिक उपायांचा समावेश होतो. प्रत्येक उपायाची आपली एक विशेषता आणि कार्यक्षमता असते, ज्याचा वापर शेताच्या परिस्थिती आणि गोगलगायांच्या प्रादुर्भावानुसार करता येतो.

पाण्याचे व्यवस्थापन : गोगलगायी ओलसर वातावरणात वाढतात, म्हणून पाण्याचे योग्य व्यवस्थापन केल्याने जमिनीतील ओलसरता कमी करता येतो, ज्यामुळे गोगलगायींची संख्या कमी होते.

भौतिक उपाय : पिकांच्या आजूबाजूला तांब्याच्या पट्ट्या, खडू, किंवा अंड्याच्या कवचाचा वापर केल्याने गोगलगायींना रोखता येते. तांब्याच्या पट्ट्यांमुळे गोगलगायींचा शरीरातील विद्युत प्रवाह प्रभावित होतो, ज्यामुळे ते पुढे जाऊ शकत नाहीत. गोगलगायींना हाताने गोळा करून शेतातून काढून टाकणे, विशेषतः लहान शेतात किंवा घराच्या बागेत हे उपयुक्त ठरते.

जैविक उपाय : बदक, कोंबड्या, बेडूक, आणि काही बीटल्स हे गोगलगायींचे नैसर्गिक शत्रू आहेत. यांना शेतात ठेवून गोगलगायींची संख्या नियंत्रित करता येते. नेमाटोड्सचा वापर करून गोगलगायींना मारता येते. हे परजीवी नेमाटोड्स गोगलगायींच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्यांना मारतात. उदा. नेमास्लग नेमाटोड्स

रासायनिक उपाय : आयर्न फॉस्फेट किंवा मेटलडिहाइड-आधारित मॉलस्किसाइड्सचा वापर केला जातो. आयर्न फॉस्फेट हे पर्यावरणास सुरक्षित असते आणि ते इतर प्रजातींना नुकसान पोहचवत नाही. विषारी चारा ठेवून गोगलगायींना आकर्षित केले जाते. हे चारा ठिकाणांवर योग्य ठिकाणी ठेवणे आवश्यक असते, ज्यामुळे इतर प्राण्यांना हानी पोहचणार नाही.

बिअर आणि यीस्ट सापळ्यांचा वापर : गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी बिअरचा सापळा अत्यंत प्रभावी आहे. बिअरमध्ये असलेल्या फर्मेंटेशन बाय-प्रॉडक्ट्समुळे गोगलगायीं त्याकडे आकर्षित होतात. बिअरचा सापळा तयार करण्यासाठी शेतातले कंटेनर जमिनीवर ठेवून त्यात बिअर भरली जाते. गोगलगायी बिअरच्या वासाने आकर्षित होऊन त्यात अडकतात आणि मरतात. याशिवाय, यीस्ट आणि साखर पाण्यात मिसळून तयार केलेला सापळा देखील प्रभावी ठरतो. यीस्ट सापळा तयार करण्यासाठी पाण्यात साखर मिसळून त्यात यीस्ट घातली जाते. हे मिश्रण बिअरप्रमाणेच गोगलगायींना आकर्षित करते आणि त्यांना नष्ट करण्यास मदत करते. हे सापळे शेताच्या विविध ठिकाणी ठेवून गोगलगायींच्या आक्रमणावर नियंत्रण मिळवता येते.

# डोंगरकिन्हीची जि.प. शाळा दोन वर्षापासून धुळखात पडुन

## पीएमश्री योजनेंतर्गत शाळेकडे लोकप्रतिनिधी आणि शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील डोंगर किन्ही येथील कोट्यवधीं रुपये खर्चून बांधण्यात आलेली जिल्हा परीषदेची माध्यमिक शाळा शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभार आणि राजकीय श्रेयवादातुन दुर्लक्षित झाल्याने २ वर्षांपासून धुळखात पडुन असुन सध्या १९६५ साली बांधण्यात आलेल्या जुन्या ईमारतीत भरत असुन अपु-या जागेमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तर भिंतीला तडे गेलेले असुन त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.शाळेसाठी आवश्यक संरक्षण भिंत, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा,संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय आदिसाठी आवश्यक निधींची तरतुद करून उर्वरित काम तातडीने पूर्ण करून नविन जागेत स्थलांतरित करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेनुसार राज्यातील ८४६ शाळांची निवड करण्यात आली होती.पाटोदा तालुक्यातुन गेल्यावर्षी एकमेव डोंगर किन्ही येथील जिल्हा परिषद शाळेची निवड करण्यात आली. ''पीएमश्री''च्या शाळा आदर्श विद्यालये असतील पुर्णपणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांशी सुसंगत असतील शाळांचे पुर्णपणे आधुनिकीकरण केले जाईल, इमारतींचीही सुधारणा पायाभूत सुविधेनुसार केली जाईल.स्मार्ट क्लास रूम,संगणक, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.शाळांमध्ये डिस्कव्हरी ओरिएंटेड आणि लर्निंग सेंट्रीक टीचिंग मेथड राबविण्यात येणार असुन नवीन गोष्टी शिकण्याची आणि शोधण्याची क्षमता मुलांमध्ये विकसित होईल अशा पद्धतीने शिक्षण देण्याचा अंतर्भाव आहे. उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून १ कोटी ८८ लाख रूपयांच्या निधीची तरतूद ५ वर्षासाठी करण्यात आली. अभ्यासक्रम,अध्यापनशास्त्र, मुल्यमापन पायाभूत सुविधा,मानव संसाधन, शालेय नेतृत्व, समावेशक पद्धती व समाधान,व्याधस्थापन, देखरेख आणि प्रशासन लाभार्थी समाधान यांना प्राधान्य दिले जाणार असुन योजनेची अंमलबजावणी शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. मात्र डोंगर किन्ही येथील जिल्हा परिषद शाळेकडे मात्र शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.





जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर डोंगरकिन्हीकरांची जुन्या शाळेचा न्यायालयीन वाद सुरू असुन सध्याची ईमारत अपुरी पडत असल्याने नविन शाळा बांधण्याची मागणी केल्यानंतर तत्कालीन शिक्षण सभापती राजेभाऊ देशमुख यांच्या कडून नविन शाळा बांधकामासाठी मंजुरी घेतली. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली.आ.सुरेश आण्णा धस यांच्या कडुन त्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.शाळेचे कामाचे अंदाजपत्रक अडीच कोटी रूपयांचे असुन उर्वरित आवश्यक कामांसाठी निधीची आवश्यकता असुन पाठपुरावा सुरू असुन शाळा कार्यान्वित होणं गरजेचं असल्याचं जिल्हा परिषद सदस्य प्रकाश कवठेकर यांनी सांगितले.

**प्रकाश कवठेकर**

जिल्हा परिषदेच्या सध्या सुरू असलेल्या शाळेत जागा अपुरी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. उर्वरित आवश्यक बांधकामासाठी निधी देण्यात यावा आणि २ शिक्षक आणि २ शिपाई यांची रिक्त पदे भरण्यात यावीत यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे. आष्टी करांच्या राजकीय श्रेयवादात मात्र पाटोदा तालुक्याकडे दुर्लक्ष होत असुन कोट्यवधी खर्चून बांधण्यात आलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा असुन अडचण आणि नसुन खोळंबा अशी अवस्था झाली आहे.अशी खंत सरपंच आण्णासाहेब येवले यांनी व्यक्त केली.

**आण्णासाहेब येवले**

### खोल्यांची आवश्यकता

डोंगर किन्ही माध्यमिक जिल्हा परिषद शाळा ५ ते १० वी पर्यंत असुन सध्या २६५ विद्यार्थी पटसंख्या आहे. नविन बांधण्यात आलेल्या शाळेत ६ वर्गखोल्या बांधण्यात आलेल्या आहेत.मात्र ५ वी ते १० वी वर्ग आणि यासोबतच प्रयोगशाळा, संगणक, ग्रंथालय,कार्यालय, परीक्षा विभाग, शालेय पोषण आहार, स्टोअर रूम आदी आणखी ६ खोल्यांची आवश्यकता आहे. महत्वाची बाब म्हणजे शाळेसमोर मोठा ओढा असल्याने मुलांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंतीचे काम होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेत ९ शिक्षक कार्यरत असुन शाळेत २ पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने काही वर्ग नव्या शाळेत भरवले तरी शिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होणार आहेत.

---

# गेवराई मतदारसंघाला पवार-पंडित मुक्त करायचे आहे - ॲड. शेख शफीक



गेवराई । प्रतिनिधी

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान गेवराई विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.

बैठकीत गेवराई तालुका प्रभारी तथा प्रवक्ते युनुस मामु, तालुका युवक अध्यक्ष हाफीज नवीद, तालुका उपाध्यक्ष शेख साहील, युवक शहराध्यक्ष शेख फेरोज, शहर सचिव शेख शाकेर, मालापुरी सर्कल अध्यक्ष सय्यद सलाम, शेख नजीर, सिराला सय्यद, शाकेर भाई बारुदवाले, शेख मोहम्मद, शाकेर भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे. या अगोदर जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरलेले नाही. यामुळे विकासात्मक कामे काही बरोबर होऊ शकली नाही. एमआयएम ला आपला पक्ष उभारणी सह जनतेची आणि विकासाची कामेही करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर तयार आहेत. असे शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

# शेख फारूक यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

एम आय एम बीड तालुका उपाध्यक्ष शेख फारुक यांनी आपल्या शेकडो समर्थक सह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये शहर प्रमुख शेख निजाम यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर प्रवेश केला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सध्या भगवा सप्ताह सुरू असून सदरील सप्ताहामध्ये पक्ष संघटनेची बांधणी व येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने मोर्चे बांधणीची आढावा बैठक घेण्यात आलेली होती.

सदरील बैठकीमध्ये पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी व कर्तृत्वाने प्रभावित होऊन मा.आ. सुनील प्रभू, सुषमा अंधारे, परशुराम जाधव, आ.बदामराव पंडित, गणेश वरेकर यांच्या.मार्गदर्शनात एमआयएमच्या बीड तालुका उपाध्यक्ष शेख फारुख यांनी आपल्या शेकडो समर्थकासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये शहर प्रमुख शेख निजाम यांच्या नेतृत्वात विधानसभा संपर्कप्रमुख आशुतोष मार्कंडेय यांच्या हस्ते शिवबंधन बांधून अधिकृतरित्या जाहीर प्रवेश केलेला आहे यावेळी बोलताना शेख फारूक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की बीड एमआयएम मध्ये आता कोणतेही नेतृत्व राहिलेले नसून एम मध्ये फक्त मनमानी कारभार सुरू असल्यामुळे एम आय एम पूर्णतःसडलेली आहे येणाऱ्या पुढील दिवसात बीड शहरामध्ये शिवसेनेचा मोठा फायदा होणार असून नगरपरिषद शिवसेनेच्या ताब्यात येणार आहे शेख फारूक यांच्या मुळे शिवसेनेची ताकद चांगले वाढलेले असून शिवसेना अजून मजबूत झालेली आहे शेख फारुक यांची अनेक मुस्लिम मावळ्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला शिवसेना बीड विधान प्रमुख मा.अशितोष माकडेय, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, संगिताताई चव्हाण, शेख निजाम, गोरक शिंघण, राजुभाऊ महुवाले, नितीन धांडे, गजानन कदम, सय्यद रियाज, शेख अश्फाक. रवी आण्णा वाघमारे, शेख नईम, अनेक मान्यवर उपस्थितीत होते



# आम आदमी पार्टीला ३० पदाधिकाऱ्याची एकदाच सोडचिठ्ठी

बीड । प्रतिनिधी

राज्याची विधानसभा निवडणुक जवळ येत आहे. या निवडणुकीच्या तोंडावरच पक्ष बळकटीकरणापेक्षा स्वतःचेच चालवायचे त्यामुळे पदाधिकारी आणि इतर कार्यकर्त्यांचा, पक्षाचा काहीएक विचार करायचा नाही या मनमानीला कंटाळून आद आदमी पार्टीचे जिल्ह्यातील ३० पदाधिकारी यांनी एकाच वेळी आम आदमी पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष अजित फाटले यांना राजीनामा पाठवून सोडचिठ्ठी दिली आहे.

निवडणुकीच्या रणसंग्राम जवळ येत असतांनाच जिल्हाभरात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्याकडे पदाधिकारी यांनी मागण्या केल्या की, पक्ष बळकटीकरणासाठी संघटनात्मक काम करु या, वेगवेगळ्या टीम तयार करुन त्यांना वेगवेगळे कामे देवूयात, महिला भगिनींना पक्षात प्रवेश देण्यासाठी प्रयत्न करुयात परंतु आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष कोणतीही भूमिका घ्यायला तयार नाहीत व पदाधिकार्यांचे ऐकायला देखील तयार नाहीत अशा मनमानी कारभाराला कंटाळून दादासाहेब नारायण सोनवणे जिल्हा उपाध्यक्ष, भिमराव चंद्रकांत कुटे युवक जिल्हाध्यक्ष, दत्ता अर्जुन सुरवसे, मुकूंद रंजीत शिंदे, विक्रम देविदास नागरगोजे, प्रविण आनेराव, प्रविण विठ्ठल पवार, लक्ष्मण नामदेव वडणे, आसारामजी नरवडे, आन्नासाहेब दत्तुपंत गव्हाणे, नवनाथ भगवान जामकर, राम सपकाळ, गौतम डोळस, मनिषा मुंडे, मदन विठ्ठल जामकर, विठ्ठल वाणी ,आसमान जरांगे पाटील, विष्णुपंत गिरी, अंबादास चव्हाण, नारायण आघाव, दिगांबर कडे, सुदर्शन गात, संजु देवकर, टिळेकर गणेश, आयुष शेख, दादा जरांगे, सुभाष जरांगे, निलेश कळमकर यांच्या अन्य पदाधिकारी यांनी एकाचवेळी सोडचिठ्ठी दिली आहे.

# मोहरमचा सण हर्षोल्लासात साजरा

बीड । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बीड शहरातील तेरवी लाईन-धांडे गल्ली भागात असलेल्या आशूर्खाना चिल्ला जिंदेशाह मदार शाह कमिटी कडून मोहरम सणानिमित्त सवारीची स्थापना करण्यात आली होती. तसेच सरबत आणि जेवणाची ही व्यवस्था चोख करण्यात आली होती. यात मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांकरीताही जेवणाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. ज्या आशूर्खानामध्ये सवारी बसविण्यात येते त्या आशूर्खान्याची काही वर्षांपूर्वी पडझड झाल्याने त्याचे नवीन बांधकाम करणे आवश्यक आहे. मात्र यासाठी कमिटीकडे आर्थिक तरतूद नसल्याने आशुर्खानाच्या बांधकामासाठी बीड नगर परिषद आणि वक्फ कार्यालयाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कमिटीचे अध्यक्ष अलाउद्दीन खान उर्फ सय्यद क्रिकेटर यांनी म्हटले आहे.

यावर्षी ८ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२४ असे १० दिवस मोहरमचा सन सवारी बसवून साजरा करण्यात आला. दररोज सवारी चे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक भक्त येत होते. विशेष म्हणजे यात मुस्लिम बंधू-भगिनींसह हिंदू बंधू-भगिनीही मोठ्या संख्येने सहभागी होत होते. लागोपाठ १० दिवस चाललेला मोहरमचा सण त्या निमित्ताने येथे बसविण्यात आलेल्या सवारी आणि सरबत व जेवणाच्या कार्यक्रमास वक्फ बोर्ड आणि बीड नगर परिषद सह पोलीस प्रशासनाने यथासंभव सहकार्य केल्याने दहाही दिवस येथे सर्वधर्मीयांनी मिळून मोहरम सण हर्षोल्लासात साजरा केला. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा उत्सव येथे सवारींसाठी असलेल्या आशुर्खानामध्ये साजरा करण्यात येत होता परंतु गेल्या काही वर्षांपासून त्याचे बांधकाम जुने झाल्याने आशूर्खानाची पडझड झाली आहे. म्हणून तेथे हा उत्सव साजरा करता येत नाही. हा उत्सव साजरा करण्यासाठी आशुर्खाना ऐवजी दर्गाच्या बाजूला मंडप टाकून हा उत्सव साजरा करावा लागत आहे. तर दर्गा समोर अत्यंत छोट्याशा जागेत सवारी बसवावी लागत आहेत. यामुळे मोहरम सण साजरा करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. या अडचणी दूर व्हाव्यात याकरिता नवीन बांधकाम करून आशुर्खाना तयार करणे आवश्यक झाले आहे. परंतु यासाठी कमिटीकडे आर्थिक तरतूद नसल्याने आशूर्खाण्याच्या नवनिर्माणाकरिता बीड नगर परिषद आणि वक्फ बोर्डाकडे पाठपुरावा करीत असल्याचे कमिटीचे अध्यक्ष अलाउद्दीन खान उर्फ सय्यद क्रिकेटर यांनी म्हटले आहे.

---

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मोंढा रोडचा प्रश्न मार्गी-पटेल, नाईकवाडे

## प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर महिनाभरात होणार कामाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या दोन महत्वाच्या भागांना जोडणाऱ्या मोंढा रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून व माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या सहकार्याने जिल्हा नियोजनमधून निधी मिळणार आहे.प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसात टेंडर प्रक्रिया पूर्ण होणार आहे. या रस्त्यासाठी निधी मिळावा म्हणून पालिकेचे गटनेते फारूक पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न तातडीने मार्गी लागावा म्हणून लक्ष घातलेले आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना २०२४-२५ अंतर्गत नगरसेवक अमर नाईकवाडे हे प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून विविध विकास कामे करण्यासाठी देण्यात येणारा निधी हा प्रभाग क्रमांक २ मधील शिवशारदा बिल्डिंग (जालना रोड) ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) पर्यंतचा रस्ता हा दुभाजकासह सिमेंट काँक्रेटचा करण्यासाठी देण्यात यावा अशी मागणी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या रस्त्यासाठी निधी देण्याची ग्वाही दिलेली आहे. दरम्यान आता प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर येत्या १५ ते २० दिवसात टेंडर प्रक्रिया पूर्ण होणार असून महिनाभरात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. एमआयडीसी, नवा मोंढा, जुना मोंढा यासह नव्या आणि जुन्या बीड शहराला जोडणाऱ्या या महत्वाचे रस्ता काम मार्गी लावल्याबद्दल फारूक पटेल व अमर नाईकवाडे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.



चौकट

१७ डीपी रस्त्यांच्या कामास शासनाची अद्याप मंजुरी नाही.

बीड नगर परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना टप्पा तीन मधील एकूण १७ सिमेंट रस्त्यांसाठीचा प्रस्ताव हा राज्य शासनाच्या नगर विकास विभागास पाठवण्यात आलेला आहे. परंतु त्यास अद्याप शासनाची मंजुरी मिळालेली नाही. निवडणुकीपूर्वी मंजुरी मिळण्याची शक्यता कमी आहे. मोंढा रोडची सद्यस्थिती पाहता व स्थानिक व्यापारी व त्या भागातील नागरिकांनी हे रस्ता काम शक्य तितक्या लवकर करण्यात यावे अशी सूचना नाईकवाडे व पटेल यांना केली होती. त्यामुळेच पालकमंत्री नामदार धनंजयजी मुंडे यांना विनंती करून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून हे रस्ता काम करण्यात यावे अशी विनंती अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी केली होती. जनमताच्या आग्रहाखातर आम्ही पालकमंत्र्यांकडून हा रस्ता मंजूर करून घेतलेला आहे. त्यामुळे स्थानिक नगरसेवकांसह जनतेने या कामी सहकार्य करणे अपेक्षित आहे असे अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी कळविले आहे.

# आयशर-दुचाकीच्या धडकेत पती ठार तर पत्नी गंभीर जखमी

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी-पाथरी रस्त्यावरील सिंदखेड येथे दुचाकी व आशयरच्या धडकेत पती ठार तर पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना आज ५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडली. यात उमेश जैवळ हे जागीच ठार झाले तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाल्या आहेत.



घनसावंगी तालुक्यातील मंगु जळगाव येथील राहणारे उमेश जैवळ हे आपल्या कुंभारपिंपळगाव येथे नव्यानेच या शैक्षणिक वर्षांपासून चालू केलेल्या सन-साईन इंग्लीश स्कुलचे वर्ग संपवून आपल्या पत्नीसह दुचाकीवरुन घनसावंगीकडे जात असतांना सिंदखेड गावाच्या जवळ घनसावंगीकडून येणार्या मालवाहू आशयर (एमएच-२०-जीसी-३२५८)ची समोरा-समोर धडक झाल्याने दुचाकीवरुन जाणारे उमेश जैवळ (३८) हे जागीच ठार झाले तर त्यांच्या पत्नी अश्विनी जैवळ या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर प्राथमिक उपचार घनसावंगी येथील ग्रामीण रुग्णालयात करुन पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आले आहे. हा अपघात एवढा भीषण होता की दुचाकीचे समोरील चाक ही निखळून पडले होते. कुंभारपिंपळगाव येथे अल्पवधीतच उमेश जैवळ यांचा मित्र परिवार मोठा केला होता. त्यांच्या अकाली अपघाताने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# बीड लोकसभा मतदार संघात २१,५३,७७६ मतदार

## दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**बीड । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा मतदार संघात २१,५३,७७६ मतदार आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत दुसरा विशेष संक्षप्ति पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिध्‍?द करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यासंदभात राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपजिल्हा निवडणुक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे तसेच प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी



उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. ०१जुलै २०२४ या अर्हता दिनाकांवर आधारीत दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांनुसार बीड जिल्ह्यातील २२८ गेवराई, २२९ माजलगाव, २३० बीड, २३१ आष्टी, २३२ केज व २३३ परळी या सहा विधानसभा मतदार संघातील सर्व २४१६ मतदान केंद्राचे ठिकाणी, सर्व मतदार नोंदणीचा पुनरीक्षण प्रारूप अंतर्गत मतदार यादी प्रसद्धि करण्यात आली. विधानसभा मतदार संघ निहाय मतदार केंद्र व मतदार संख्या २२८ गेवराई विधानसभा मतदार संघात एकूण मतदान केंद्राची संख्या ४०४ असून यामध्ये पुरूष मतदार १,९३,७६२, महिला मतदार १,७२,२१६, इतर ९ इतके आहेत

२२९ माजलगाव विधानसभा मतदार संघात एकूण मतदान केंद्राची संख्या ३९३, पुरूष मतदार १,८०,६६८, महिला मतदार १,५९,९८९ इतर १ २३० बीड विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र ३९६, पुरूष मतदार १,९५,८६६ महिला मतदार १,७२,२६१, इतर ११ २३१ आष्टी विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र ४४०, पुरूष मतदार २,००,३८८, महिला मतदार १,७५,०२७ इतर १ २३२ केज विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र ४२०, पुरूष मतदार १,९७,५५९, महिला मतदार १,७८,१७४, इतर ३ २३३ परळी विधानसभा मतदार संघात एकूण मतदार केंद्र ३६३ पुरूष मतदार १,७१,८१५ महिला मतदार १,५६,०२३ इतर ३ असे एकूण २४१६ मतदान केंद्र असून एकूण पुरूष मतदार ११,४०, ०५८ महिला मतदार १०,१३,६९० इतर २८ असे एकूण २१,५३,७७६ मतदार संख्या ३९ बीड लोकसभा मतदार संघात आहे. आज ही प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

# अंबाजोगाई कार्यालयातील होत असलेला भ्रष्टाचार बंद करा नसता आंदोलन छेडू, वंचित बहुजन आघाडीची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

उपविभागीय परिवहन कार्यालय येथे आज दि. ०५ ऑगस्ट २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने निवेदना मार्फत केली आहे.



रिकाम्या खुर्चीला दिले निवेदन अंबाजोगाईला कार्यालयाला कोणी वालीच नाही

अंबाजोगाई कार्यालयात पैशाच्या देवाण-घेवाणीचा सुळसुळाट सुरु आहे. कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी कार्यालयांची सर्व कामे खाजगी व्यक्ती मार्फत पैशाची देवाण-घेवाण करूनच करत आहेत. अंबाजोगाई कार्यालय, येथील अधिकारी व कर्मचारी खुलेआम जनतेची लूट करत आहेत. खाजगी व्यक्ती अधिकारी, कर्मचारी यांच्या ऑफीसमध्ये बसुन काम करतात. त्यांना तात्काळ ऑफीस मधुन बाहेर काढण्यात यावे. कार्यालयात लर्निंग लायसन्स काढण्यासाठी, परमनंट लायसन्ससाठी, ड्रायविंग टेस्टसाठी, वाहन पासिंगसाठी, वाहन ट्रान्सफरसाठी, परमिट रिनिव्हलसाठी, फिटनेससाठी या सर्व बाबीसाठी ३०० रुपयांपासून २५०० रुपये पावतीची रक्कम सोडून घेतले जातात. त्यावर हप्तेबाजी वेगळी आहे. हा सर्व भ्रष्टाचार तात्काळ बंद करण्यात यावा अन्यथा वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई च्या वतीने स्टिंग ऑपरेशन करून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरोधात मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय तथा उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई समोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा ईशारा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना या निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई च्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्ह्याचे प्रसिद्धी प्रमुख सुशांत धावरे, नंदकुमार वाघमारे, विशाल जोगदंड,रवि गायसमुद्रे,साहिल गोमसाळे,मारोती सरवदे,रामराजे सरवदे ई. कार्यकर्त उपस्थित होते.

# धारूरमधील अनेक पथदिवे बंद ; अर्धे शहर अंधारात

## काही पथदिवे दिवसा सुरू रात्री बंद मुख्याधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरातील अनेक भागातील पथदिवे बंद पडले आहेत त्यामुळे रात्रीच्या वेळी अर्धे शहर अंधारामध्येच असते व काही पथदिवे दिवसा सुरू असतात तर रात्री बंद असतात दिवसा पथ दिवे सुरू राहिल्यामुळे अधिक चे वीज बिल भरणा करावे लागते. या कडे मुख्याधिकारी नगर परिषद यांनी लक्ष देणे गरजेचे आहे

धारूर नगर परिषदेणे संपूर्ण शारमधे पथदिवे बसवणे व त्याची देखभाल करण्यासठी खाजगी कंत्राटदार नियुक्त केला आहे .कंत्राट दाराच्या माध्यमातून शहरातील विद्युत खांबावर पथदिवे बसवले आहेत परंतु मागील काही दिवसापासून शहरातील मुख्य रस्ता, बाजार तळ, कासार तलाव परिसर, मुख्य बाजारपेठ शहरातील गल्लीबोळा,सह अनेक भागतील पथदिवे मागील अनेक दिवसापासून बंद आहेत. बंद पडलेले पथदिव्याकडे नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष नसल्याने शहरात अंधार पडला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक राजमाता जिजाऊ महाविद्यालय या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेले नगर परिषदेचे पथ दिवे बंद असल्यामुळे या रस्त्यवर देखील अंधार असतो . त्यामुळे शहरात रात्रीच्या वेळी नागरिकांना बाहेर फिरण्यासाठी मोबाईलच्या टॉर्च चा वापर करावा लागत



आहे

हजारो रुपये खर्च करून नगर परिषदेच्या जुन्या इमारती समोर उभारलेला हायमॅक्स , हनुमान चौक येथील हायमॅक्स देखील बंद पडला आहे याकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष असल्याचे दिसते. लाखो रुपयाचे खाजगी कंत्राट दिलेले असताना बंद पडलेले पथ दिवे कधी बसवले जाणार असा प्रश्न शहरातील नागरिकांना पडला आहे.

# निष्क्रिय आघाडी सरकारमुळे मतदार संघात निर्माण झालेला विकासाचा बॅकलॉग आमदार पवारांनी भरून काढला

## नुकताच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ६५ कोटी तर अर्थसंकल्पातून ८२ कोटीचा निधी मंजुर

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदार संघात नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ७ गावच्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ६५ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला तर अर्थसंकल्पातून २३ गावच्या रस्त्याला ८२ कोटी ४५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. शेवटच्या टप्प्यातही मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आमदार पवार आघाडी सरकारच्या काळातील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत.

आ. लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघातील जवळजवळ सर्वच प्रमुख व गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागले आसून उर्वरित रस्त्यासाठीही त्यांचा पाठपुरावा व प्रयत्न सुरू असुन नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गेवराई मतदार संघातील रामपुरी ते ढालेगाव रस्ता ४.७१ किमीसाठी रु ७ कोटी ४३ लक्ष, प्रजिमा माटेगाव ते ब्राम्हगाव ३ किमी या रस्त्यासाठी रु ४ कोटी ३९ लक्ष, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी या रस्त्यासाठी रु ७ कोटी ९० लक्ष, मारफळा फाटा ते लोणाळा - खेरडावाडी ते चिंचोली ४.६५० किमी या रस्त्यासाठी रु ६ कोटी ६७ लक्ष, रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.



तलवाडा रोड ते रेवकी देवकी गोंदी रस्ता १२.२०० किमीसाठी रु २७ कोटी ७ लक्ष, टाकरवन - तलवाडा रोड ते सेलू ३.५४ किमी या रस्त्यासाठी रु ५ कोटी २४ लक्ष, सावरगाव ते चिखली रस्ता ४.२०० किमीसाठी रु. ६ कोटी २७ लक्ष असा या ७ गावच्या ४० किमी सिमेंट कॉंक्रिट रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. तलवाडा रोड ते रेवकी-देवकी ते गोंदी रस्ता अवैध वाळू वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला होता. या रस्त्यावरून वागणे अक्षरशः नागरिकांना असाहाय्य झाले होते. विशेष बाब म्हणून आमदार पवार यांनी नामदार गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून साडेपाच मीटर रुंदीचा सिमेंट कॉंक्रिट हा एकमेव रस्ता मंजूर करून घेतला आहे. गेवराई मतदार संघातील प्रत्येक गावांची रस्त्यांची अडचण दुर करण्यासाठी विविध योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून प्रत्येक वर्षी रस्ते मंजुर करून मतदार संघातील दळण वळणांचा मार्ग सुकर करत आसल्याचे त्यांनी कळवले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात एकूण २३ रस्त्याच्या कामांना ८२ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामध्ये चकलांबा ते तरडगव्हान रस्ता २ कोटी ५० लक्ष, बोरगाव ते कुरणपिंपरी ६ कोटी, गोपतपिंपळगाव ते काठोडा तांडा व काठोडा तांडा ते जातेगाव या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यासाठी रु १५ कोटी तर, तलवाडा चौक ते गंगावाडी फाटा २ कोटी ५० लक्ष, (पान २ वर)

# बीडमध्ये फिरते बाल वाचनालय सुरु

## बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या अनोख्या उपक्रमाचे कौतूक

बीड । प्रतिनिधी

शहरातील संभाजी प्राथमिक शाळेत बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून फिरत्या बालवाचनालयाचे उद्घाटन मंगळवारी (दि.६) करण्यात आले.

कार्यक्रमास बालरंगभूमी परिषदेच्या डॉ.दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, प्रा.अनिता शिंदे, प्रा.विजयकुमार राख, प्रा.सुरेश थोरात, चंदनशिव, सुरेश साळुंके, मुख्याध्यापिका भोज खरसाडे, रणखांब, वीर, धर्मे, वायभट आदींची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी बालगीते, राज्य गीत, देशभक्तीपर गीते गायली आणि नृत्याचे सुंदर असे सादरीकरण केले.



बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचा भाग म्हणून डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी फिरते वाचनालय सुरु केले आहे. या उपक्रमामध्ये दोन पेट्या तयार करण्यात आलेल्या असून एक जिल्ह्यासाठी तर दुसरी तालुक्यासाठी असेल. ज्यामध्ये बालक, कुमारवयीन मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, बोधकथा, बालगीते, समाजसुधारकांचे विचार अशी अनेक बालसंस्कार आणि बाल मनोरंजन करणारी पुस्तके आहेत. १० दिवस ही पुस्तक पेटी एका शाळेत मुलांना वाचनासाठी उपलब्ध राहील. पुढे १० दिवसांनी दुसर्या शाळेत फिरवल्या जाईल, असे हे फिरते बाल वाचनालय आहे. यावेळी ग्रंथालय प्रमुख डॉ.शेख यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनासंबंधी सूचना दिल्या. संभाजी शाळेच्या मुख्याध्यपिका वीणा भोज यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वीर यांनी केले. आभार डॉ.दुष्यंता रामटेके यांनी मानले.

शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा-डॉ.दिपाताई क्षीरसागर

सध्या मुले लहानपणापासूनच मोबाईलच्या आहारी जाऊन, डोळ्याचे विकार असतील व इतर आजार किंवा डिप्रेशनने ग्रासलेले दिसतात. तेव्हा वाचन संस्कृती वृद्धिंगत करून हा संस्कार बाल मनावर रुजवावा. या उद्देशाने फिरते बाल वाचनालयाची सुरवात करण्यात आली आहे. सर्व शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे मत बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

# बीड विधानसभा महिला आघाडीची धुरा जयश्री विधाते यांच्या हाती -जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा २०२४ च्या पार्श्वभूमीवर आज जयदत्त आण्णा क्षीरसागर विचारमंचच्या महीला आघाडीची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीत महीला भगीनींना मार्गदर्शन करताना माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेब यांनी बीड विधानसभेचे रणसिंग फुंकत बीड नगरपरिषदेच्या मा. सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांची बीड विधानसभा महीला आघाडी प्रमुख म्हणून घोषणा केली. आजपासुन विधाते ताईच्या नेतृत्वात महीला आघाडी विधानसभेचच्या रणांगणात आपण आजवर केलेल्या विकासकामाचा



लेखाजोखा सामान्य मतदार भगींनीनीन पर्यंत घेऊन जातील अशा माता भगीनींनच्या आशिर्वाद आणि शुभेच्छातुन उभा राहाणारी स्त्री- शक्ती येणाऱ्या विधानसभेत यश आपल्या पदरात पाडून घेईल आसा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी जयश्री विधाते यांनी पदभार स्वीकारत बैठकीला संबोधित करताना म्हणाल्याआण्णासाहेबांनी महीला आघाडी प्रमुख पदांची टाकलेली जवाबदारी सर्व कार्यकर्ता भगीनींच्या सहकार्याने रात्रींचा दिवस एक करुन आण्णासाहेबांना प्रचंड बहुमताने पुन्हा एकदा विधानसभेत पाठवून बीड विधानसभेला गत वैभव प्राप्त करून देऊ असा निर्धार केला.

या वेळी व्यासपीठावर नगरसेवक मुखिदलाला , सनी वाघमारे सलीमभाई, पंचायत समिती सभापती उषाताई सरवदे, नगरसेविका सुशिलाताई नाईकवाडे, भारतीताई क्षीरसागर, अनिता ताई डोंगरे , शेख सीमा तब्बसुम शेख अजित सुलताना यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. संगीताताई शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन किर्तीताई पांगारकर यांनी केले.यावेळी बीड शहरातील महीला आघाडीच्या शेकडो कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# एक शाम 'किशोर दा' के नाम : अंबाजोगाईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या गाण्यांना उपस्थितांनी दिली भरभरून दाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सुप्रसिद्ध गायक किशोर कुमार यांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाईत दिनांक ४ ऑगस्ट रविवार रोजी एक शाम 'किशोर दा' के नाम या कार्यक्रमाचे आयोजन 'अभी' झेरॉक्स, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी करण्यात आले होते. या कार्यक्रमात स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या किशोर कुमार यांच्या एकापेक्षा एक सरस गाण्यांनी उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित रसिकांनीही कलाकारांच्या सादरीकरणाला भरभरून दाद देत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अंबाजोगाई शहरात गेल्या २० वर्षांपासून सुप्रसिद्ध गायक किशोर कुमार यांचे चाहते मिलिंद मस्के आणि विश्वजीत खोगरे त्यांचा




वाढदिवस दिमाखात साजरा करतात. 'किशोर दा' यांच्या वाढदिवसानिमित्त स्थानिक कलाकारांना सोबत घेऊन त्यांच्या गीतांचे सादरीकरण करत त्यांना अभिवादन केले जाते. यंदाही हा कार्यक्रम उत्साह आणि संगीतमय वातावरणात पार पडला. जवळपास पंधरा ते वीस कलाकारांनी आपली 'किशोर दा' यांची आवडीची गाणी अप्रतिम रित्या उपस्थित रसिकांसमोर सादर केली. यात महाविद्यालयीन तरुण आणि तरुणींचा ही सहभाग होता. एक शाम 'किशोर दा' के नाम या कार्यक्रमाची सुरुवात किशोर कुमार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या नंतर गायक सुभाष शेप यांनी गायलेल्या 'प्रथम नमो गोतमा' या वंदन गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर सुभाष शेप यांनीच 'किशोर दा' यांची मेलोडी गायली. गायक विनय परदेशी, राज माने, गोविंद कुलकर्णी, डॉ. राजेश इंगोले, राजेश पौळ, ऐश्वर्या जैन, अमोल शेप, डॉ. चामणर यांच्यासह आदींनी 'किशोर दा' यांची गाजलेली गाणी गाऊन त्यांना अभिवादन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बैरागी, प्रदीप बनसोडे, प्रा. राहुल हातागळे, वर्धापन ढोले, यशवंत सरवदे, हनुमंत कांबळे, गौरव कसबे, प्रणीत वाघमारे, खदीरभाई फुलवाले, अरुण मोरे, आशिष बडे, कैलास गांधले यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने 'किशोर दा' यांचे चाहते उपस्थित होते.

'आधार माणूसकीचा' संस्थेला ३ लाखांची मदत

सुप्रसिद्ध गायक किशोर कुमार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांचे चाहते मिलिंद मस्के यांनी गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी ३ लाख रुपये मदत करण्याची घोषणा केली. ही मदत 'आधार माणूसकीचा' या सामाजिक संस्थेला डिसेंबर २०२४ पर्यंत टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असल्याचे मिलिंद मस्के यांनी सांगितले. यावेळी 'आधार माणूसकीचा' संस्थेचे ॲड. संतोष पवार आणि पत्रकार प्रशांत बर्दापूरकर उपस्थित होते. यावेळी संस्थेतर्फे मिलिंद मस्के यांचा सत्कार करण्यात आला.

# अनिल जगताप यांच्या वतीने कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे वाटप!

**बीड । प्रतिनिधी**

गरजवंतांना मदतीचा हात देऊन समाजसेवेसाठी सदैव तत्पर असणारे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने काल दि. २ ऑगस्ट रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे (व्हाईट बोर्ड) वाटप करण्यात आले.

बीडमधील दुर्गम भागात असणाऱ्या कंकालेश्वर विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या वतीने अनिलदादा जगताप यांनी वाह्यांचे वाटप केले होते. दरम्यान शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेला लेखन फलकांची (व्हाईट बोर्ड)



आवश्यकता असल्याचे सांगितले होते. शाळेची गरज लक्षात घेऊन अनिलदादा यांनी कंकालेश्वर विद्यालयात सहा लेखन फलकांचे वाटप करून मदत केली. अनिलदादा जगताप यांच्या वतीने शिवसेनेचे बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, पंकज कुटे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे आणि गौरव वायभट यांनी शाळेचे मुख्याध्यापक अंबादास शेकडे, संदीप जाधवर, शिवाजी जाधवर, वीरेंद्र जाधव, सुरेश पतंगे आणि राम मोराळे यांच्याकडे सहा लेखन फलक (व्हाईट बोर्ड) सुपूर्त केले. याप्रसंगी कंकालेश्वर विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी अनिलदादा जगताप यांचे आभार मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.०७ ऑगस्ट २०२४ । पान ७

# अन्यथा आम्ही दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनावर बहिष्कार टाकू, प्रकाशक परिषदेचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं (चरीींहळ डरहळींूर डराशश्रप) सूप वाजलं असून राजधानी दिल्लीत हा सोहळा पार पडणार आहे. पण दिल्लीत होणाऱ्या या साहित्य संमेलनावरुन पुण्यातील प्रकाशक आणि प्रकाशक परिषद यांच्यात मात्र परस्पर विरोधी भूमिका दिसत आहे. इकतच नव्हे तर भूमिका मान्य नाही. इतकचं नव्हे तर प्रकाशक परिषदेकडून बहिष्कार टाकण्याचाही इशारा देण्यात आलाय. त्यामुळे यंदाचं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे वादाच्या भोवऱ्यात अडकलं असल्याची चिन्ह सध्या दिसत आहेत.

प्रकाशक परिषद आणि प्रकाशक संघ यांच्यामध्ये ही परस्पर विरोधी भूमिका पाहायला मिळेल. मराठी साहित्य दिल्लीत पोहचेल आणि ते तिथे वाचलं जाईल अशी भूमिका प्रकाशक परिषदेकडून घेण्यात आलीये. दुसरीकडे दिल्ली दूर असल्यामुळे प्रकाशकांचा खर्च वाढेल अशी भूमिका प्रकाशक संघाकडून घेण्यात आलीये.

प्रकाशकांनी नफा तोट्याचा विचार करु नये – अनिल कुलकर्णी, कोषाध्यक्ष प्रकाशक परिषद




प्रकाशक परिषदेचे कोषाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी एबीपी माझासोबत संवाद साधताना म्हटलं की, 'यंदाचं साहित्य संमेलन दिल्लीत होत आहे, याचा आम्हाला आनंदच आहे. त्यामुळे प्रकाशकांनी यासाठी विरोध करु नये. साहित्य संमेलनामुळे दिल्लीत हे साहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे साहित्य महामंडळाने ही जबाबदारी आमच्यावर सोपवली आहे, तर ती आम्ही यशस्वीरित्या पार पाडू. दिल्लीतही मराठी लोकं आहेत. तेही या संमेलनासाठी येतील. फार पुस्तकांची विक्री नाही झाली तरी त्याला उत्तम प्रतिसाद मिळेल. त्यामुळे प्रकाशकांनी नफा तोट्याचा विचार करुन नये, दिल्लीत जे काही होईल त्याचा नक्कीच फायदा होईल.'

प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे यांनी यासंदर्भात एबीपी माझाला प्रतिक्रिया देताना म्हटलं की, नागपूरपासून बेळगांवपर्यंत आणि मुंबईपासून ते गडचिरोलीपर्यंत प्रकाशकांचे आम्हाला फोन आणि मेसेज आले की, साहित्य महामंडळाने हा निर्णय चुकीचा घेतला आहे. हा निर्णय त्यांना बदलायला सांगा. तिथे साहित्य संमेलन घ्यायचं की नाही हा त्यांचा अधिकार आहे. पण मागील वर्षी हे साहित्य संमेलन अमळनेर झालं, त्याच्या आधी वर्ध्याला झालं. या दोन्ही संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री फार चांगली झाली नाही.

पुढे त्यांनी म्हटलं की, या दोन्ही साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री चांगली झाली नाही, याला कारणंही वेगळी होती, याबाबत कुणाचं दुमतंही नव्हतं. अमळनेरचं संमेलन झालं तेव्हा आम्ही निम्म भाडंही परत मागितलं. तेव्हा आम्हाला सांगण्यात आलं की, पुढच्या संमेलनात तुमची कसर भरुन काढू. पण आता त्यांनी प्रकाशकांचा काहीही विचार न करता दिल्लीत संमेलन भरवलं.

१५ ते २० दिवसांपूर्वी आम्ही त्यांना पत्र देखील लिहिलं की, प्रकाशकांची चर्चा करुन संमेलनाचं ठिकाण ठरवू, त्यासाठी त्यांना सात ठिकाणांहून आमंत्रणही आलं होतं. परंतु अशी कोणतीही चर्चा त्यांनी केली नाही. आमच्या प्रक्रियेनुसारच आम्ही जाणार असं त्यांनी सांगितलं. हे साहित्य संमलेन दिल्लीला झालं तर पुणे ते दिल्ली प्रकाशकांचा खर्च वाढणार आहे. विक्री किती होणार यासंदर्भात कोणतीही माहिती नाही. आम्हाला प्रवासात काही प्रमाणात सूट द्यावी आणि सूट दिली नाही तर आम्ही साहित्य संमेलनावर बहिष्कार टाकू असा इशारा त्यांनी दिला.

# पाच टक्के कॅन्सर मोबाइलमुळे; वैज्ञानिकांचा शोध

पुणे । प्रतिनिधी

अन्न, वस्त्र, निवारा यापेक्षा आता मोबाइल फोन ही मोठी गरज झाली आहे. या छोट्याशा बॉक्सपायी सर्वजण वेडे झाले असून, मोबाइल जास्त वेळ वापरल्यावर आपला कान दुखतो. तरी आपण तो कानालाच लावून धरतो. नुकत्याच वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनात पाच टक्के मेंदूचे कॅन्सर हे मोबाइलमुळे होत असल्याची धक्कादायक माहिती पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी दिली. नागरिकांनी मोबाइलचा वापर कमी केला पाहिजे, असा सल्लाही डॉ. लहाने यांनी दिला.



सोमेश्वर फाऊंडेशनतर्फे शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित कार्यसम्राट मोफत महा-आरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सत्यजित तांबे, माजी मंत्री सुरेश नवले, माजी आमदार श्याम सावंत, माजी आमदार सुभाष बणे, माजी महापौर दत्ता गायकवाड, माजी उपमहापौर मुकारी अलगुडे, मुख्यमंत्री वैधकीय सहाय्यता निधी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, निरामय सेवा फाऊंडेशनचे रामेश्वर नाईक, महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज. बी, उपायुक्त महेश पाटील, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख आणि आयोजक माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण उपस्थित होते. दिवंगत आमदार विनायक निम्हण आणि माझी मैत्री वैचारिक भांडणातून झाली असे सांगून डॉ. लहाने यांनी आठवणींना उजाळा दिला. धो –धो पावसातही तपासणीसाठी बस भरून व्यक्ती येत आहेत. सोळा स्पेशालिटी, आठ सुपर स्पेशालिटी रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांना तपासत आहेत.

तर आलेल्या प्रत्येकाला खरी सुखरूप सोडले जात असून, आरोग्याविषयी कामासाठी सनी निम्हण यांचे अभिनंदन. सनी निम्हण यांनी विनायकरावांच्या पावलावर पाऊल ठेवत आता आमदार पदावर जायला काही हरकत नाही,' अशा भावना डॉ. लहाने यांनी व्यक्त केल्या. आमदार तांबे म्हणाले, प्रत्येक रुग्णाच्या चेहऱ्यावर समाधानाची भावना हेच सनी निम्हण यांच्या यशाचे रहस्य आहे. ना भुतो, ना भविष्यती असा कार्यक्रम आहे. आपली काळजी घेणारं या समाजामध्ये कोणीतरी आहे, अशी भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती.' अभिनेते प्रवीण तरडे म्हणाले, समाजातील दीनदुबळे , गरीब वर्गासाठी शिबीर वरदान ठरत आहे. सनी निम्हण यांनी नगरसेवक असतान चांगले काम केले आहे. आता एक पाऊल पुढे टाकून काम केले पाहिजे.'

# टोळक्याने तरुणावर केले कोयत्याने वार; वाहनांची केली तोडफोड

पुणे । प्रतिनिधी

'भाई'च्या खुनाचा बदला घेण्यासाठी टोळक्याने एका तरुणावर कोयत्याने वार केले. तसेच, वाहनांची तोडफोड करून दहशत माजविल्याची घटना सोमवारी मध्यरात्री येरवडा परिसरात घडली.

या प्रकरणी प्रवीण भगवान कांबळे (वय ३६, रा. जयप्रकाशनगर, येरवडा) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सतीश ऊर्फ गोट्या चंद्रकांत मोरे (रा. पाषाण) याच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी सतीश मोरे या संशयिताला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा परिसरात सुधीर गवस (वय २५, रा. जयप्रकाश नगर, येरवडा) याचा १७ जुलै रोजी मध्यरात्री खून केला होता. फिर्यादी प्रवीण कांबळे सोमवारी मध्यरात्री माऊली चौक ते महिंद्रा सोसायटीदरम्यान शतपावली करत होते. त्यावेळी चौघेजण कोयते घेऊन आले.

'आमचा भाई सुधीर गवसच्या खुनाचा बदला घेणारच, जो मध्ये येईल त्याला संपवून टाकू', असे म्हणत टोळक्याने कोयत्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या दुचाकी आणि रिक्षांची तोडफोड केली. त्यानंतर प्रवीणवर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले. याबाबत माहिती मिळताच पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर, येरवडाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली.

# रक्तदानाद्वारे 'माईर्स'चा स्थापना दिवस साजरा

लोणी–काळभोर । प्रतिनिधी

माईर्स एमआयटी शिक्षण समुहाच्या ४२ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने येथील एमआयटी एमआयटी आर्ट, डिझाईन, आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात, विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदानासारख्या सामाजिक मोहिमेला विद्यापीठात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह, कर्मचाऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. ज्यामुळे, शिबिराअंती तब्बल १०० हून अधिक रक्त पिशव्या संकलीत करण्यात आल्या.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन समारंभात डॉ. अतुल पाटील, संचालक एमआयटी स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट; प्रा. हनुमंत पवार, सीईओ पेरा इंडिया; प्रा. डॉ. सुरज भोयर, संचालक – विद्यार्थी व्यवहार; डॉ. सुरेश पारधे, रक्त संक्रमण अधिकारी, जिल्हा रुग्णालय, औंध पुणे; डॉ. इम्रान खान, रक्त संक्रमण अधिकारी, ससून रुग्णालय, पुणे; डॉ. अजय हुपले; श्री. शरद देसले, सामाजिक सेवा अधीक्षक, ससून रक्तपेढी; आणि श्री. सुदाम भाकडे यांनी हजेरी लावली. यावेळी उपस्थित प्रत्येक मान्यवराने रक्तदानाचे महत्व विशद करताना, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या सामाजिक उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधीलकीचे भरभरून कौतुक केले.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करून महविद्यालयीन जिवनाच्या सुरुवातीलाच आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. ससून रुग्णालय रक्तपेढीच्या माध्यमातून झालेल्या या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमआयटी एडीटी-अँडव्हेंचर क्लबच्या स्वयंसेवकांनी अत्यंत हिरीरीने सहभाग नोंदवत, विद्यार्थ्यांच्या मनातील रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर करताना त्यांना रक्तदान करण्यास प्रवृत्त केले.

# पुणे शहरात झिकाचे सर्व रुग्ण बरे; दोन दिवसात नवे रुग्ण नाही

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात गेल्या काही आठवड्यापासून झिकाचे रुग्ण आढळत होते. पण गेल्या दोन दिवसांपासून एकाही रुग्ण आढळलेला नाही. तसेच २६ गरोदर महिलांसह ६६ जणांना झिकाची लागण झाली होती. ते सर्वजण पूर्णपणे बरे झाले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

पुणे शहरात २० जून रोजी पहिला झिकाचा रुग्ण आढळून आलेला होती. त्यानंतर एरंडवणे, मुंढवा भागातही रुग्ण आढळून आले होते. त्यामुळे महापालिकेने औषध फवारणी, नागरिकांची आरोग्य तपासणी, संशयित रुग्णांचे रक्ताचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे पाठविण्यात आले होते. २० जून ते ६ ऑक्टोबर या कालावधीत शहरात एकूण ६६ जणांना झिकाची लागण झाली.

गर्भवती महिलांना झिकाचे धोका असल्याने त्यांच्याबाबत विशेष काळजी घेतली जात होती. आत्तापर्यंत २६ गर्भवती महिलांना झिकाची लागण झाली. त्यापैकी २३ महिलांची १६ जास्त आठवड्याची गर्भधारणा असल्याने त्यांची नोमॅली स्कॅन करण्यात आले. त्यात काहीही गंभीर आढळून आलेले नाही. दरम्यान गेल्या दोन दिवसांपासून शहरात एक रुग्ण आढळून आलेला नाही. जे रुग्ण आढळले होते, ते सर्वजण बरे झाले असल्याचे आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी सांगितले.

# त्या' फोन प्रकरणी भाजपचे माजी मंत्री बाळा भेगडे यांनी दिली पोलिसात तक्रार

पुणे । प्रतिनिधी

– भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांना(चरींश्र) फोन करून त्याची क्लिप समाजमाध्यमावर प्रसारित केल्या प्रकरणी भेगडे यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. बाळा भेगडे यांच्या तक्रारीवरून विनोद पोखरकर यांच्या विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.



याबाबत माहिती अशी की, बाळा भेगडे हे भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष आहेत. त्यांनी २ ऑगस्ट रोजी वडगाव मावळ येथील भेगडे लॉन्स येथे कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात भेगडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत विधान केले होते. त्यावरून विनोद पोखरकर असे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने बाळा भेगडे यांना फोन केला. 'मनोज जरांगे पाटील महाविकास आघाडीची सुपारी घेऊन काम करतात याला काय पुरावा आहे, असा जाब विचारत फोनवरील व्यक्ती भेगडे यांच्याशी अर्वाच्य भाषेत बोलली. तुम्हाला फक्त फोनवरून जाब विचारतोय. नंतर मावळात येऊन गाठीन. मनोज जरांगे पाटलांवर घसरलात ना तुम्हाला सोडणार नाही. परत सर्व राजकारण तुम्ही विसरून जाल. ही धमकी समजायची तर धमकी समजा, असे म्हणत धमकी दिली. फोनवर झालेल्या या संभाषणाची रेकॉर्डींग करून ती समाजमाध्यमांवर प्रसारित करून भेगडे यांची बदनामी केल्याचे पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत भारतीय न्याय संहिता कलम ३५१ (२), ३५२, ३५६ (२) नुसार नोंद करण्यात आली आहे.

# पुणे ग्रामीण पोलीस दलातील चालक शिपाई पदांसाठी ९ ऑगस्ट रोजी लेखी परीक्षा

पुणे । प्रतिनिधी

पुणे ग्रामीण पोलीस दलातील चालक शिपाई पदांसाठी ९ ऑगस्टरोजी लेखी परीक्षा होणार आहे. ही परीक्षा सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, सिंहगड रोड समोर, वडगाव बुद्रुक, पुणे येथे होणार आहे.

पुणे ग्रामीण पोलीस दलात ४४८ पोलीस शिपाई तर ४८ पोलीस शिपाई चालक पदांसाठी भरती होत आहे. या ४८ उमेदवारांपैकी २३ सर्वसाधारण, १५ महिला, ६ माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर, गृहरक्षक दल यांना प्रत्येक एक जागा आहे.




मागील महिन्यात उमेदवारांची मैदानी चाचणी चाचणी झाली. त्यानंतर २७ जुलै रोजी मैदानी चाचणीचा निकाल घोषित करण्यात आला. पोलीस शिपाई चालक पदांसाठी मैदानी चाचणी मधून ५६७ उमेदवार लेखीसाठी पात्र ठरले आहेत. या ५६७ उमेदवारांची लेखी परीक्षा शुक्रवारी (दि. ९ ऑगस्ट) घेण्यात येणार आहे. ही परीक्षा सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, सिंहगड रोड समोर, वडगाव बुद्रुक, पुणे येथे सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी येणाऱ्या उमेदवारांनी ९ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी केले आहे.

# श्रावणी सोमवार निमित्त श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात दूध वाटप

पुणे । प्रतिनिधी

श्रावणी सोमवार निमित्त आळंदी शिवसेना शहर प्रमुख (शिंदे गट) राहुल चव्हाण यांनी सिद्धेश्वर मंदिर परिसरात भाविकांना दुधाच्या प्रसादाचे वाटप केले. गेल्या ५ वर्षापासून श्रावणी सोमवार निमित्त ते प्रसादाचे वाटप करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




यावेळी प्रथम व्यवस्थापक माऊली विर यांच्या शुभ हस्ते भाविकांना दुधाच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घुंडरे, सचिन शिंदे, सुयश कदम, हिरामण तळेकर, सिद्धेश गिरी, चंद्रकांत पांचाळ, नितीन ननवरे, दिनकर तांबे, रोहिदास कदम इ .शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच आळंदीतील ग्रामस्थ दिनेश कुऱ्हाडे पाटील, मनोहर दिवाणे व इतर मान्यवर देखील उपस्थित होते. अनेक वर्षानंतर श्रावण महिन्याची सुरुवात सोमवार या वारी झाली असून या महिन्यात पाच श्रावणी सोमवार आहेत. असा दुर्मिळ योग अनेक वर्षांनी आला आहे. असे राहुल चव्हाण यांनी एका वृत्ताच्या माहितीनुसार सांगितले. श्रावणी सोमवार निमित्त आळंदी येथील श्री सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी होती. श्री सिद्धेश्वर महाराजांना भाविकांनी बेलपत्र, पुष्प व शिवमुठ तांदूळ वाहिले. तसेच हजारो भाविकांनी संत ज्ञनेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेतले.

# पूजा खेडकर यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा; जिल्हाधिकारी दिवसे यांनी अखेर उचललं मोठं पाऊल

पुणे । प्रतिनिधी

राज्यासह देशभरात गेल्या काही दिवसांमध्ये चर्चेचा विषय ठरलेल्या पूजा खेडकर बाबतीत एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे पुजा खेडकरवर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहेत. पूजा खेडकरनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. तशी तक्रार पुजा खेडकरनी पोलिसांना दिली आहे आणि यूपीएससीकडे देखील तशी तक्रार केली होती. पुणे जिल्ह्याधिकारी कार्यालयात प्रशिक्षण कालावधीत सुहास दिवसेंनी लैंगिक छळ केल्याचा पुजा खेडकरचा आरोप आहे. दरम्यान या आरोपांबाबत चौकशी करणाऱ्या पुणे पोलिसांनी तीन वेळा समन्स बजवून देखील पूजा खेडकर हजर झालेली नाही.

पूजा खेडकरनी पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवस यांच्यावर छेडछाडीचा आरोप केला होता. पूजा खेडकरने पुण्याचे जिल्हाधिकारी दिवसे यांच्या विरोधात वाशिम पोलिसात तक्रार दाखल केली. दिवसे यांनी लैगिंक आणि मानसिक छळ केल्याचे पूजा खेडकरनी आरोप केले होते. वाशिम पोलिसांनी महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूजा खेडकरची तक्रार नोंदवून घेतली. मात्र दिवसे यांच्याविरोधातील तक्रार वाशिम पोलीसांच्या कार्यकक्षेत येत नसल्याने ही तक्रार पुणे पोलीसांकडे वर्ग करण्यात आली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी पूजा खेडकरला या तक्रारीसंदर्भात काही चौकशीसाठी तब्बल तीन वेळा समन्स पाठवून देखील ती गैरहजर राहिली होती.




## पूजा खेडकर नातेवाईकांच्या घरी लपून बसली की दुबईला पळून गेली?

यूपीएससीने आयएएस पद काढून घेतल्यानंतर आता दुसरीकडे न्यायालयानेही पूजा खेडकरला दणका दिला आहे. पूजा खेडकर गेल्या काही दिवसांपासून फरार आहे. न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर पूजा खेडकर दुबईला पळून गेल्याची चर्चा आहे.

पूजा खेडकरचा न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर ती भारतातून थेट परदेशात पसार झाली असावी, अशी शक्यता अनेक वृत्तपत्रांमध्ये व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पूजा खेडकर वरती अनेक आरोप करण्यात आले आहेत. इतर मागासवर्ग प्रवर्गातून पूजाने खेडकरने १२ वेळा UPSC परीक्षा दिल्याचे समोर आले आहे.

## तीनदा समन्स बजावूनही पूजा खेडकर जबाब नोंदवण्यास गैरहजर

जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध छळवणुकीची तक्रार प्रकरणात प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर तीनदा समन्स बजावूनही पुणे पोलिसांसमोर हजर झाली नाही. पूजा खेडकरनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध वाशिममध्ये छळवणुकीची तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने खेडकरला पुणे पोलिसांकडे जबाब नोंदविण्याचे आदेश देण्यात आले होते. पुणे पोलिसांनी तिला दोनदा समन्स बजाविले होते. त्यावेळी खेडकरनी पोलिसांकडे काही अवधी मागितला होता. आठवडाभरानंतर पूजा खेडकर पोलिसांसमोर हजर झाली नाही. जबाब नोंदविण्यास उपस्थित रहावे, असे समन्स पोलिसांनी तिला पुन्हा बजावण्यात आले होते. तीनदा समन्स बजावूनही ती हजर झाली नाही. खेडेकरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, तिचा मोबाइल क्रमांक संपर्क क्षेत्राबाहेर असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. त्यानंतर आता दिल्ली पोलिस देखील पूजा खेडकरचा शोध घेत आहेत.

# जलमय भागातील ३ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा सुरक्षिततेसाठी बंद

पुणे : संततधार पाऊस व धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने पुणे, पिंपरी शहर तसेच खेड, मावळ व आंबेगाव तालुक्यातील सुमारे ३ हजार ५० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद करून ठेवण्यात आला आहे.

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने नदीपात्राच्या परिसरातील डेक्कनमधील पुलाची वाडी व प्रेमनगरातील१०० सिंहगड रस्त्यावरील एकतानगरमधील ७ सोसायट्यांचे ४५०, बालेवाडीमध्ये भीमनगरातील १०० विश्रांतवाडीमध्ये शांतीनगर व इंदिरानगरातील ४०० मंगळवार पेठमध्ये जुना बाजार परिसरातील ४५० तसेच ताडीवाला रोड परिसरातील ४५०अशा अशा सुमारे १ हजार ९५० वीजग्राहकांचा वीजपुरवठा सुरक्षिततेसाठी बंद ठेवण्यात आला आहे. तर पिंपरीमध्ये संजय गांधीनगर व पिंपरी कॅम्पमध्ये ४०० वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. तसेच वीजयंत्रणा पुराच्या पाण्यात गेल्याने मावळ तालुक्यातील वडिवळे, वळख, बुधावाडी, सांगिसे, नेसावे, खांडशी आणि खेड तालुक्यातील साकुर्डी, कहू, वेताळे, सायगाव कोठुळे येथील सुमारे ७०० वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. तर आंबेगाव तालुक्यात डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या पंचाळे खुर्द व वचपे या गावामध्ये भूस्खलन होत आहे. तेथील नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. तसेच वीज सुरक्षेच्या दृष्टीने तेथील सुमारे १५ ग्राहकांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे, असे महावितरण यांनी जाहीर केले आहे.